## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१९ मसुदा

# सारांश

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मसुद्यासाठी स्थापित समिती

**अध्यक्ष**

के. कस्तुरीरंगन, माजी संचालक, इस्रो, बेंगळुरू

**सदस्य**

अ. वसुधा कामत, माजी कुलगुरू, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई

आ. मंजुळ भार्गव, आर. ब्रँडन फ्रँड प्रोफेसर ऑफ मॅथेमॅटिक्स, प्रिन्स्टन विद्यापीठ, यूएसए

इ. राम शंकर कुरील, माजी संस्थापक कुलगुरू, बाबासाहेब आंबेडकर समाजशास्त्र विद्यापीठ, मध्य प्रदेश

ई. टी. व्ही. कट्टीमणी, कुलगुरू, इंदिरा गांधी राष्ट्रीय आदिवासी विद्यापीठ, अमरकंटक, मध्य प्रदेश

उ. कृष्ण मोहन त्रिपाठी, शिक्षण संचालक (माध्यमिक) आणि माजी अध्यक्ष, उत्तर प्रदेश माध्यमिक व इंटरमीडिएट परीक्षा मंडळ, उत्तर प्रदेश

ऊ. मजहर असिफ, प्राध्यापक, पर्शियन व मध्य आशियाई अभ्यास केंद्र, भाषा, साहित्य व सांस्कृतिक अभ्यास विद्यालय, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली

ऋ. एम. के. श्रीधर, माजी सदस्य सचिव, कर्नाटक राज्य शोध परिषद, बेंगळुरू, कर्नाटक

**सचिव**

ऌ. शकीला टी. शमसू, विशेष कार्य अधिकारी (राष्ट्रीय शिक्षण धोरण), उच्च शिक्षण विभाग, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली

## मसुदा समितीचे सदस्य

अ. मंजुळ भार्गव, आर. ब्रँडन फ्रँड प्रोफेसर ऑफ मॅथेमॅटिक्स, प्रिन्स्टन विद्यापीठ, यूएसए

आ. के. रामचंद्रन, सल्लागार, राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, नवी दिल्ली

इ. अनुराग बेहर, सीईओ, अझीम प्रेमजी फाऊंडेशन व कुलगुरू, अझीम प्रेमजी विद्यापीठ, बेंगळुरू

ई. लीना चंद्रन वाडिया, ऑब्झर्व्हर रिसर्च फाऊंडेशन, मुंबई

# दूरदृष्टी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१९ भारताला केंद्रस्थानी मानून अशा शिक्षण प्रणालीची कल्पना करते जी सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण प्रदान करून आपल्या राष्ट्राला सातत्याने न्याय्य व चैतन्यमय ज्ञानी समाजामध्ये परिवर्तित करण्यात थेट योगदान देते.

# धोरणाचा आढावा – महत्वाचे मुद्दे

## १. शालेय शिक्षण

अ. प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षण: सदर धोरण प्रारंभिक वर्षांच्या महत्वावर भर देते आणि २०२५ सालापर्यंत ३ ते ६ वयोगटातील सर्व मुलांना प्रारंभिक बाल्यावस्थेतील दर्जेदार निगा व शिक्षण दिले जात असल्याची दक्षता घेणे, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. याकरिता गुंतवणुकीमध्ये लाक्षणिक वाढ करून नवनवीन उपक्रम राबविण्याचाही या धोरणाच्या उद्दिष्टामध्ये समावेश आहे.

आ. पायाभूत साक्षरता व अंकज्ञान: इयत्ता पहिली ते पाचवीमध्ये प्रारंभिक भाषा व गणित यांच्याकडे विशेष ध्यान पुरविले जाईल. सन २०२५ पर्यंत इयत्ता पाचवी व त्यापुढील इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थ्यास पायाभूत साक्षरता व अंकज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता घेणे, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

इ. अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र: शालेय शिक्षणासाठी ५+३+३+४ रचनेवर आधारित बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित एक अभिनव विकासात्मकदृष्ट्या योग्य अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र रचना विकसित करण्यात आली आहे. शाळांमध्ये विज्ञान, समाजशास्त्र, कला, भाषा, क्रीडा, गणित इ. सर्व विषयांवर समान भर देताना व्यावसायिक (पेशाविषयक) व शैक्षणिक शाखांचे एकीकरण करण्यात येईल.

ई. वैश्विक प्रवेश: सन २०३० पर्यंत विविध उपाययोजनांच्या माध्यमातून सर्व शालेय शिक्षणामध्ये १००% ग्रॉस एनरोलमेंट रेशो (म्हणजेच एकूण विद्यार्थ्यांपैकी पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुणोत्तर) आत्मसात करणे, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

उ. न्याय्य व सर्वसमावेशक शिक्षण: जन्म व कौटुंबिक पार्श्वभूमी यांच्याशी निगडित परिस्थितीमुळे कोणतेही मूल शिकण्याच्या व प्रगतीच्या एकाही संधीला मुकणार नाही, याची हमी देण्यासाठी या धोरणामध्ये अनेक नियोजित उपाययोजना अंतर्भूत आहेत. यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी विशेष शिक्षण झोनदेखील उभारण्यात येतील.

ऊ. शिक्षक: शिक्षकांची नेमणूक अतिशय सक्षम व पारदर्शक प्रक्रियेद्वारे करण्यात येईल. शिक्षकांना गुणवत्तेच्या निकषांनुसार बढती देण्यात येईल. कामगिरीचे बहुस्रोतांवर आधारित नियमित मूल्यमापन करण्यात येईल आणि शैक्षणिक प्रशासक किंवा शिक्षकांचे शिक्षक होण्यासाठी श्रेणी प्रगमनाचे (प्रोग्रेशन) मार्ग उपलब्ध असतील.

ऋ. शालेय अनुशासन: शाळांची व्यवस्था व आयोजन शालेय संकुलांमध्ये (शालेय संकुल म्हणजे १०-२० शासकीय शाळांचा समूह) करण्यात येईल. अनुशासन व प्रशासन यांचे हे मूलभूत एकक असेल. याद्वारे सक्षम व्यावसायिक शिक्षक समुदायासोबतच पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर), शैक्षणिक सुविधा (उदा. ग्रंथालये) व मनुष्यबळ (उदा. कला व संगीत शिक्षक) अशा सर्व प्रकारच्या साधनांची उपलब्धता होत असल्याची दक्षता घेता येईल.

ऌ. शालेय विनियमन: स्वारस्यसंघर्ष टाळण्याहेतू शाळांचे विनियमन व प्रचालन स्वतंत्र समित्यांकरवी करण्यात येईल. धोरणनिर्मिती, विनियमन (रेग्युलेशन), प्रचालन (ऑपरेशन्स) व शैक्षणिक बाबींकरिता सुस्पष्ट व स्वतंत्र प्रणाली अस्तित्वात असतील.

## २. उच्च शिक्षण

अ. नवीन संरचना (आर्किटेक्चर): विशाल, सर्वसाधनसमृद्ध, चैतन्यमय बहुविध शाखांनी सुसज्ज संस्थांद्वारे उच्च शिक्षणासाठी नवीन दूरदृष्टी व संरचना (आर्किटेक्चर) परिकल्पित करण्यात आली आहे. सध्या अस्तित्वात असलेली ८०० विद्यापीठे व ४०,००० महाविद्यालये सुमारे १५,००० उत्कृष्ट संस्थांमध्ये संकलित करण्यात येईल.

आ. उदारमतवादी शिक्षण: विज्ञान, कला, मानवतावाद, गणित व व्यावसायिक क्षेत्रांचा एकात्मिक व सखोल अनुभव मिळण्याच्या उद्देशाने पदवीपूर्व (अंडरग्रॅज्युएट) स्तरावरील व्यापक स्वरूपाचे उदारमतवादी कला शिक्षण अंमलात आणण्यात येईल. यामध्ये कल्पनाविलासी व लवचिक अभ्यासक्रमाची रचना, अभ्यासाचे कल्पक संयोजन, व्यावसायिक शिक्षणाचे एकीकरण आणि बहुविध प्रवेश/प्रस्थान बिंदू (एंट्री/एक्झिट पॉईंट्स) असतील.

इ. अनुशासन: संस्थांचे अनुशासन शैक्षणिक, प्रशासकीय व आर्थिक स्वायत्ततेवर आधारित असेल. प्रत्येक उच्च शिक्षण संस्था एका स्वतंत्र मंडळाकडून प्रशासित असेल.

ई. विनियमन: आर्थिक विश्वसनीयता साध्य करण्यासाठी संस्थांचे विनियमन 'सुटसुटीत पण कडक' पद्धतीचे असेल आणि स्वारस्यसंघर्ष टाळण्याहेतू जनहितार्थ उद्देशाने करावयाची शाळांची प्रमाणित उभारणी, वित्तपुरवठा, प्रमाणन (ॲक्रेडिटेशन) व विनियमन स्वतंत्र समित्यांकरवी करण्यात येईल.

## ३. शिक्षक शिक्षण

शिक्षक सज्जता कार्यक्रम अतिशय कसून घेण्यात येतील आणि सदर कार्यक्रम चैतन्यमय, बहुविध शाखांनी सुसज्ज असलेल्या उच्च शिक्षण संस्थांमध्ये राबविण्यात येतील. बहुविध शाखांनी सुसज्ज असलेल्या या उच्च शिक्षण संस्थांमध्ये स्तरानुसार, विषयवार राबविण्यात येणारा व एकीकरण केलेला ४ वर्षांचा 'बॅचलर ऑफ एज्युकेशन' हा अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी संपादित करणे, हा शिक्षक होण्याचा प्रमुख मार्ग असेल. दुय्यम दर्जाच्या व अकार्यक्षम शिक्षक शिक्षण संस्था बंद करण्यात येतील.

## ४. पेशाविषयक शिक्षण

सर्व प्रकारचे पेशाविषयक/व्यावसायिक शिक्षण उच्च शिक्षण प्रणालीचा अविभाज्य घटक असेल. स्वतंत्र तांत्रिक विद्यापीठे, आरोग्यशास्त्र विद्यापीठे, विधी व कृषी विद्यापीठे किंवा या क्षेत्रातील किंवा तत्सम इतर क्षेत्रांतील संस्था बंद करण्यात येतील.

## ५. व्यावसायिक शिक्षण

व्यावसायिक शिक्षण सर्व प्रकारच्या शिक्षणाचा अविभाज्य घटक असेल. सन २०२५ पर्यंत सर्व शिकाऊ विद्यार्थ्यांपैकी किमान ५०% विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचा लाभ मिळावा, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

## ६. नॅशनल रिसर्च फाऊंडेशन

संपूर्ण देशभर संशोधन व नवकल्पना या गोष्टींचा प्रसार वेगाने व्हावा, या हेतूने नवीन संस्थेची स्थापना करण्यात येईल.

## ७. शिक्षणामध्ये तंत्रज्ञान

वर्गातील शिक्षण प्रक्रिया सुधारण्यासाठी, शिक्षकांच्या व्यावसायिक विकासास साहाय्य करण्यासाठी, वंचित गटांना मिळणाऱ्या शिक्षणाच्या संधी वाढविण्यासाठी आणि शैक्षणिक नियोजन, प्रशासन व व्यवस्थापन सुसूत्रबद्ध करण्यासाठी शिक्षणाच्या सर्वच स्तरांवर योग्य पद्धतीने तंत्रज्ञान समाविष्ट करणे, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

## ८. प्रौढ शिक्षण

युवकांमध्ये व प्रौढांमध्ये १००% साक्षरता साध्य करणे, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

## ९. भारतीय भाषांना चालना

हे धोरण सर्व भारतीय भाषांचे संवर्धन, वृद्धी व चैतन्य अबाधित राहील, हे सुनिश्चित करेल.

## १०. शिक्षणासाठी वित्तपुरवठा

सार्वजनिक शिक्षणाचा विस्तार व पुनरुज्जीवन करण्यास्तव मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक क्षेत्रातून गुंतवणूक करण्यात येईल.

## ११. राष्ट्रीय शिक्षण आयोग

पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षण आयोग किंवा नॅशनल एज्युकेशन कमिशनची स्थापना करण्यात येईल. हा आयोग भारतातील शैक्षणिक दूरदृष्टीचा परिरक्षक (कस्टोडियन) असेल.

# धोरणाचा तपशील – महत्वाचे मुद्दे

# शालेय शिक्षण

## १. प्रारंभिक बाल्यावस्था निगा व शिक्षण यांचे सबलीकरण

**उद्देश:** सन २०२५ पर्यंत ३-६ वयोगटातील प्रत्येक मुलाला मोफत, सुरक्षित, उच्च दर्जायुक्त, विकासात्मकदृष्ट्या योग्य निगा व शिक्षण प्रदान करणे.

सदर धोरण मुलांच्या जीवनातील प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणाच्या महत्वावर आणि या शिक्षणामुळे व्यक्तीला संपूर्ण आयुष्यभर होणाऱ्या चिरंतन फायद्यांवर भर देते.

अ. स्थानिक गरजा, भौगोलिकता व विद्यमान पायाभूत सुविधा यांबाबत बहुआयामी दृष्टिकोन ठेवल्यास प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या **सुविधांचा महत्वपूर्ण विस्तार आणि सबलीकरण** होईल.

आ. विशेषतः सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित असलेले जिल्हे/ठिकाणे यांच्याकडे विशेष लक्ष पुरविले जाईल आणि त्यांना प्राधान्य दिले जाईल. दर्जा व निष्पत्ती यांची योग्य देखरेख करण्यासाठी प्रक्रिया अस्तित्वात आणण्यात येतील.

इ. शिक्षक व पालक या दोघांच्याही दृष्टीने विचार करून प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणासाठी अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र यांचा आराखडा विकसित करण्यात येईल. या आराखड्यामध्ये ०-३ वयोगटातील मुलांना योग्य आकलनात्मक उत्तेजना देण्यासाठी पूरक मार्गदर्शक सूचना व ३-८ वयोगटातील मुलांसाठी पूरक शैक्षणिक मार्गदर्शक सूचना यांचा समावेश असेल.

ई. स्तरानुसार प्रशिक्षण, मार्गदर्शन (मेंटॉरिंग) आणि निरंतर व्यावसायिक विकास व कारकीर्द आराखडा (करियर मॅपिंग) यांच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणामध्ये अध्यायन-सुलभ वातावरणनिर्मिती व उच्च दर्जेदार शिक्षकांचे व्यावसायिकरणही करण्यात येईल.

उ. (सध्याच्या 'मनुष्यबळ विकास मंत्रालया'चे नाव बदलून 'शिक्षण मंत्रालय' करण्यात येईल.) आणि प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणाचे सर्व पैलू व घटक **शिक्षण मंत्रालयाच्या** कार्यकक्षेत येतील. परिणामतः, प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षण उर्वरित शालेय शिक्षणाशी जोडण्यात येईल. संबंधित हस्तांतरण आराखड्यास (ट्रांझिशन प्लॅन) शिक्षण मंत्रालय, महिला व बाल विकास मंत्रालय आणि आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यांच्याकडून सन २०१९ पर्यंत संयुक्तरित्या अंतिम स्वरूप देण्यात येईल.

ऊ. संबंधित नियमांचे अनुपालन होत असल्याची हमी मिळण्यासाठी सर्व शालेयपूर्व शिक्षण प्रदान करणाऱ्या (खाजगी, शासकीय व धर्मादायी) संस्थांकरिता प्रभावी **दर्जेदार विनियमन किंवा प्रमाणन (ऍक्रेडीटेशन) प्रणाली** निर्माण करण्यात येईल.

ऋ. आपल्या मुलांच्या शैक्षणिक गरजांना सक्रियपणे साहाय्य करण्याहेतू पालकांना सक्षम करण्यासाठी व्यापक पुरस्कार (ऍडव्होकसी) व उपलब्ध माहितीचा मोठ्या प्रमाणावर प्रसार करून **सहभागी भागधारकांकडून (स्टेकहोल्डर्स) मागण्या** निर्माण करण्यात येतील.

ऌ. ३-६ वयोगटातील सर्व मुलांसाठी मोफत व सक्तीचे दर्जेदार शिक्षण उपलब्ध होत असल्याची दक्षता घेण्यासाठी **'शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९' ('दि राईट टू एज्युकेशन ऍक्ट, २००९')** चा विस्तार करण्यात येईल.

## २. सर्व मुलांना पायाभूत साक्षरता व अंकज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता

**उद्देश:** सन २०२५ पर्यंत इयत्ता पाचवी व त्यापुढील इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थ्यास पायाभूत साक्षरता व अंकज्ञान आत्मसात होणे.

हे धोरण प्रारंभिक भाषा व गणित यांच्याशी निगडित गंभीर अध्ययन समस्या जाणते आणि त्यांच्या निवारणास सर्वोच्च प्राधान्य प्रदान करते.

अ. पोषण व अध्ययन एकमेकांशी घनिष्टपणे संबंधित आहेत. **माध्यान्ह भोजन कार्यक्रमाचा विस्तार** करण्यात येईल – पूर्वप्राथमिक व प्राथमिक शालेय विद्यार्थ्यांना पोषक नाश्ता व माध्यान्ह भोजन या दोन्ही गोष्टी पुरविण्यात येतील. मुलांना सदैव दर्जेदार अन्न पुरविण्यात यावे याकरिता कार्यक्रमावरील खर्च तत्कालीन अन्नखर्च व महागाई यांच्याशी जोडण्यात येईल.

आ. **इयत्ता पहिली ते पाचवीमध्ये प्रारंभिक भाषा व गणित यांच्याकडे विशेष ध्यान** पुरविले जाईल. इयत्ता पहिली ते पाचवीमधील विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता व अंकज्ञान आत्मसात व्हावे यासाठी व त्याचसोबाबत मूल्यमापन व दर्जेदार साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी सशक्त प्रणाली उभी करण्यावर वाढीव लक्ष केंद्रित करण्यात येईल. राष्ट्रीय शिक्षक पोर्टलवर भाषा व गणित साहित्य यांचा राष्ट्रीय स्तरावरील संग्रह (रिपॉझिटरी) उपलब्ध असेल.

इ. शिक्षकांना शिकविताना सोयीस्कर व्हावे याकरिता उपयुक्त तांत्रिक साहित्य व साहाय्य पुरविण्याची चाचणी घेण्यात येईल आणि वाचन व संवाद यांची सवय व संस्कृतीची बांधणी करण्याच्या हेतूने सार्वजनिक व शालेय ग्रंथालयांचा विस्तार करण्यात येईल.

ई. इयत्ता पहिलीमधील सर्व विद्यार्थ्यांसाठी तीन महिन्यांचा कालावधी असलेला **‘शालेय पूर्वतयारी अभ्यास’** आयोजित करण्यात येईल.

उ. पायाभूत साक्षरता व अंकज्ञान यावर नव्याने भर देण्याच्या उद्देशाने **शिक्षक शिक्षणाची पुनर्रचना** करण्यात येईल.

ऊ. (सहयोगी शिक्षकांसाठी) **राष्ट्रीय शिक्षक कार्यक्रम** व (समुदायातील आरेखन निर्देशकांसाठी) **दोषनिवारक निर्देशन साहाय्य कार्यक्रम (रिमेडिअल इंस्ट्रक्शनल एड्स प्रोग्रॅम)** सुरु करण्यात येईल.

ऋ. प्रत्येक शालेय स्तरावर **विद्यार्थी – शिक्षक** यांचे गुणोत्तर ३०:१ असे राहील, याची खात्री देण्यात येईल.

ऌ. **समाजसेवक व समुपदेशक** सर्व मुलांचे मानसिक आरोग्य अबाधित राखणे, मुले शाळा सोडून न जाणे, **पालकांचा** सहभाग व **स्थानिक समुदायांची** जमवाजमव करण्याची खात्री देतील. तसेच पायाभूत साक्षरता व अंकज्ञान संबंधित धोरणाची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी **स्वयंसेवकांचा** उपयोग करण्यात येईल.

## ३. सर्व स्तरावरील शिक्षणामध्ये सर्वांना वैश्विक प्रवेश व त्यांना शिक्षणप्रवाहात टिकवून ठेवणे

**उद्देश:** सन २०३० पर्यंत ३-१८ वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीच्या दर्जेदार शालेय शिक्षणास प्रवेश मिळून शिक्षणामध्ये त्यांचा सहभाग होणे.

मुलांचा शाळेमध्ये होणारा प्रवेश वाढत असला तरी यथावकाश मुलांची शाळेतून होणारी गळती आपल्याला थांबविता येत नसल्याबाबत हे धोरण चिंता व्यक्त करते.

अ. सन २०३० पर्यंत विविध उपाययोजनांच्या माध्यमातून शालेयपूर्व काळापासून ते माध्यमिक शिक्षणापर्यंत **१००% ग्रॉस एनरोलमेंट रेशो** साध्य करावयाचा आहे.

आ. शाळेतील मुलांच्या भरतीच्या संख्येत वाढ करणे, ज्या ठिकाणी शालेय सेवा आजवर देता आलेली नाही किंवा कमी प्रमाणात उपलब्ध आहे अशा ठिकाणी नवीन सुविधा विकसित करणे, आणि सर्व विद्यार्थ्यांसाठी, विशेषतः मुलींसाठी, संपूर्ण सुरक्षेची हमी देऊन शाळेत ये-जा करण्यासाठी दळणवळण सेवा व वसतिगृहाची सेवा आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देणे, अशा उपाययोजनांमधून शालेय **प्रवेशाची दरी** कमी करण्याचा मानस आहे.

इ. शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलांच्या दैनंदिन उपस्थितीचा व अध्ययनाच्या निष्पत्तीचा आढावा घेणे, तसेच शिक्षक, समाजसेवक व स्वयंसेवक यांच्यामार्फत शाळेतून गळती होणाऱ्या व शाळेत न येणाऱ्या मुलांच्या संख्येवर पाळत ठेवणे आणि शाळेबाहेरील पौगंडावस्थेतील मुलांसाठी कार्यक्रम राबवून मुलांचा शालेय **शिक्षणातील सहभाग व अध्ययन** वाढविले जाईल. औपचारिक व अनौपचारिक शैक्षणिक माध्यमांमधून अध्ययनाचे वेगवेगळे मार्ग उपलब्ध करून दिले जातील आणि सोबतच खुले शालेय शिक्षण (ओपन स्कूलिंग) व दूरवरून शालेय शिक्षण (डिस्टन्स स्कूलिंग) व तंत्रज्ञान मंच वापरण्याची साधने यांचे सबलीकरण करण्यात येईल.

ई. जर आरोग्यविषयक कारणास्तव विद्यार्थी शाळेत उपस्थित राहू शकत नसतील तर त्यांनी **त्वरित शाळेत रुजू होण्यास आवश्यक असलेल्या उपाययोजना** करण्यात येतील. त्यामध्ये शाळेत आरोग्यसेवकांची नेमणूक करणे, तसेच याविषयी विद्यार्थी, पालक व व्यापक प्रमाणावर समाजामध्ये जनजागृती करणे आणि त्यांना योग्य आरोग्य सेवांशी संपर्क करून देणे या बाबींचा समावेश होतो.

उ. **शिक्षणाचा अधिकार अधिनियमाच्या** अनुपालनाच्या आवश्यक बाबी व अटी **शिथिल** करण्यात येतील आणि त्याचसोबत (शारीरिक व मानसिक) सुरक्षा, प्रवेश व समावेश, नफाविरहित तत्त्वावर शाळांचे प्रचालन आणि अध्ययनाच्या निष्पत्तीची किमान मानके याबाबत खातरजमा करण्यात येईल. यामुळे स्थानिक पातळीवर गरजेनुसार बदल करून व पर्यायी विकल्प उपलब्ध करून शासकीय व गैरशासकीय संस्थांसाठी शाळा सुरु करणे सुलभ केले जाईल.

ऊ. **शिक्षणाचा अधिकार अधिनियमाचा विस्तार** करून शालेयपूर्व शिक्षणापासून इयत्ता बारावीपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करून देण्यात येईल.

## ४. शालेय शिक्षणासाठी अभिनव अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र रचना

**उद्देश:** घोकंपट्टीद्वारे करण्यात येणारे अध्ययन कमी करून त्याऐवजी सर्वांगीण विकास आणि शोधक विचारक्षमता, सर्जनशीलता, शास्त्रीय मनन, सुसंवाद, परस्परसहकार्य, बहुभाषिकता, समस्या निवारण, नीतीतत्त्वे, सामाजिक बांधिलकी व अंकीय साक्षरता अशा २१व्या शतकातील अभिनव कौशल्यांवर आधारित अध्ययनाला चालना देण्यासाठी सन २०२२ पर्यंत अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र यांमध्ये आमूलाग्र बदल करणे.

सध्याच्या शालेय शिक्षणाचा अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र अध्ययनार्थींच्या विकसनाच्या विविध टप्प्यांवर त्यांच्या गरजा व कल यांच्याशी सुसंगत होण्यासाठी अभ्यासक्रमाची व अध्यापनशास्त्राची पुनर्रचना करण्यात येईल.

अ. त्यामुळे सध्याच्या शालेय शिक्षणाचा अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र यांची रचना व शालेय शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचा आराखडा ५+३+३+४ मांडणीनुसार बनविला जाईल:

- पायाभूत स्तर (वय ३-८ वर्षे): शीघ्र बौद्धिक विकास; खेळ व शोधनावर आधारित अध्ययन
- तयारीचा स्तर (वय ८-११ वर्षे): खेळ व शोधन यांच्यावर आधारित बांधणी; रचनात्मक अध्ययनाकडे संक्रमणाची सुरुवात
- मधील स्तर (वय ११-१४ वर्षे): विषयांमधील संकल्पना शिकणे; पौगंडास्थेतील वाटचालीस सुरुवात
- दुसरा स्तर (वय १४-१८ वर्षे): उदरनिर्वाह व उच्च शिक्षण यासाठी तयारी; युवा प्रौढत्वाकडे संक्रमण

आ. दुसऱ्या स्तरामध्ये चार वर्षांचा बहुशाखीय अभ्यासक्रम असेल आणि त्यामध्ये विषयातील खोली, शोधक विचारक्षमता, जीवनातील महत्वाकांक्षांकडे ध्यान देण्याची क्षमता विकसित केली जाईल आणि त्यामध्ये विद्यार्थ्यांना विषय निवडीस वाव असेल.

इ. सर्वांगीण अध्ययनार्थी विकसित करण्याच्या दृष्टीने शालेय शिक्षणाचे साहित्य व प्रक्रिया यांची पुनर्रचना करण्यात येईल. अभ्यास अधिक खोलवर अभ्यास व्हावा व प्रायोगिक अध्ययन अधिक प्रमाणात व्हावे यासाठी **अभ्यासक्रमाचा भार** थोडासा कमी करून तो महत्वाच्या संकल्पना व आवश्यक कल्पना यांच्यापुरताच मर्यादित ठेवण्यात येईल.

ई. भाषा, शास्त्रीय मनन, सौंदर्यशास्त्र व कला यांची जाण, सुसंवाद, नैतिक कारणमीमांसा, अंकीय साक्षरता, भारताविषयी ज्ञान, स्थानिक समुदाय, देश व जगाला भेडसावत असलेल्या गंभीर व महत्वाच्या समस्यांचे ज्ञान यांमध्ये प्रभुत्व प्राप्त करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाईल.

उ. **अभ्यासक्रम लवचिक** असेल ज्यामध्ये अभ्यासक्रमांतर्गत, सहअभ्यासक्रम किंवा अभ्यासक्रमबाह्य असा किंवा कला व विज्ञान असा किंवा 'व्यावसायिक' व 'शैक्षणिक' असा स्पष्ट भेद नसेल. यामुळे विद्यार्थ्यांना दुसऱ्या शालेय स्तरादरम्यान विषय बदलण्याची संधी व पर्याय उपलब्ध असतील.

ऊ. किमान इयत्ता पाचवीपर्यंत किंवा शक्यतो इयत्ता आठवीपर्यंत शिक्षण **स्थानिक भाषेत/मातृभाषेत** असेल आणि गरजेनुसार लवचिक भाषा (द्विभाषा) दृष्टिकोन अंमलात आणण्यात येईल.

ऋ. गरजेनुसार व शक्य असेल तिथे उच्च दर्जाची पाठ्यपुस्तके स्थानिक भाषेत उपलब्ध करून देण्यात येतील आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य विकसित करण्यात येईल.

ऌ. संपूर्ण देशभरातून **त्रिभाषीय सूत्र** हिरिरीने राबविण्यात येईल. भाषा शिक्षक विकसित करून त्यांची नेमणूक करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येतील.

ऍ. इयत्ता सहावी ते आठवीदरम्यान सर्व विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये व कलाकुसर याविषयी संपूर्ण एका वर्षाचा सर्वेक्षण (सर्व्हे) कोर्स करावा लागेल. यामुळे शालेय शिक्षणादरम्यानच मुलांना **व्यावसायिक क्षेत्राचा अनुभव** मिळण्यास सुरुवात होईल. इयत्ता नववी ते बारावीमधील मुलांना पारंपरिक शैक्षणिक विषयांसोबतच व्यावसायिक विषयांची निवड करण्याची संधी असेल. त्याबाबत मुलांना दोन्ही प्रकारचे अभ्यासक्रम मिश्र पद्धतीने निवडण्याची मुभा असेल.

ऎ. सन २०२० च्या समाप्तीपर्यंत **राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्या**ची पुनर्रचना करून त्यामध्ये सुधारणा करून तो सर्व प्रांतीय भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. नवीन **पाठ्यपुस्तके** विकसित करण्यात येतील आणि त्यांची उच्च दर्जाची **भाषांतरे** निर्माण करण्यात येतील.

ए. विद्यार्थ्यांच्या विकासाला साहाय्य होईल अशा प्रकारे **मूल्यमापनामध्ये** आमूलाग्र बदल करण्यात येतील. (बोर्डाच्या परीक्षांसह) सर्व परीक्षा मुलांच्या मूळ संकल्पना व कौशल्ये आणि त्यासोबत उच्चस्तरीय क्षमता तपासतील. सन २०२५ पर्यंत मध्यस्तरीय व त्यावरील सर्व शालेय शिक्षणाचे मूल्यमापन अनुकुलक संगणकीय चाचणी (ऍडाप्टिव्ह कम्प्युटराईझ्ड टेस्टिंग) पद्धतीने करण्यात येईल. सन २०२०/२०२१ पासून पुढे वर्षभरात शाळांमधून विविध बुद्धिमापन चाचण्या व निरनिराळ्या विषयांच्या चाचण्या घेण्यात येतील आणि स्वायत्त राष्ट्रीय चाचणी संस्थेकडून या चाचण्यांचे प्रशासन करण्यात येईल.

ऐ. विद्यार्थ्यांमधील **असामान्य प्राविण्य व स्वारस्य** शोधण्यात येतील आणि शाळा ते जिल्हास्तरीय संस्था, निवासी वासंतिक कार्यक्रम, ऑलिंपियाड्स व स्पर्धा यांच्यामार्फत विषयवार व प्रकल्पवार पद्धतीने त्यांचे विकसन करण्यात येईल.

## ५. शिक्षक – बदलाचे प्रणेते

**उद्देश:** शालेय शिक्षणातील सर्व स्तरावरील सर्व विद्यार्थ्यांना व्यासंगी, उत्स्फूर्त, उच्चशिक्षित, व्यावसायिकदृष्ट्या प्रशिक्षित आणि सुसज्ज शिक्षकांकडून शिकविले जाईल, याची दक्षता घेणे.

या धोरणानुसार शिक्षक 'समाजातील सर्वात महत्वाच्या व्यक्ती आहेत आणि भविष्यातील अपेक्षित बदलाचे प्रणेते' आहेत. दर्जेदार शिक्षण देण्यासाठी करण्यात येणारे कोणत्याही प्रयत्नाचे यश शिक्षकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असते.

अ. वंचित, ग्रामीण व आदिवासी भागातील हुशार विद्यार्थ्यांना चार वर्षाचा एकीकृत केलेला बी. एड्. अभ्यासक्रम घेता यावा याकरिता त्यांच्यासाठी **गुणवत्तेवर आधारित शिष्यवृत्ती** प्रदान करण्यात येईल. काही बाबतीत, त्यांना त्यांच्या स्थानिक भागात रोजगाराची हमी देण्यात येईल. विशेषतः विद्यार्थिनींवर खास लक्ष केंद्रित करण्यात येईल.

आ. सर्व शाळांमधील **शिक्षकांची नियुक्ती** 'सर्वसमावेशक शिक्षक आवश्यकता नियोजन' यावर आधारित कडक व नियमबद्ध प्रकियेतून केली जाईल. अशा निवडीदरम्यान उमेदवारांमध्ये वैविध्य राखण्यासोबत स्थानिक शिक्षकांना व स्थानिक भाषेवर प्रभुत्व असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल. यातील पहिली पायरी असेल पुनर्रचना करण्यात आलेल्या शिक्षक पात्रता चाचणीमध्ये (टीचर एलिजिबिलिटी टेस्ट) उत्तीर्ण होणे. त्यानंतर मुलाखत घेतली जाऊन सोबतच अध्यापनाचे प्रात्यक्षिकही सादर करावे लागेल. हल्ली अनेक राज्यांमध्ये करण्यात येते त्यानुसार शिक्षकांची नियुक्ती जिल्हास्तरावर करण्यात येऊन त्यांची नेमणूक शालेय संकुलामध्ये करण्यात येईल. अशा शिक्षकांच्या सेवेची कालमर्यादा निश्चित स्वरूपाची असेल आणि तंत्रज्ञानानावर आधारित पारदर्शक प्रणालीनुसार नियमाप्रमाणे त्यांच्या बदल्या करण्यात येतील. ग्रामीण भागात शिकविण्यास प्रोत्साहित करण्याहेतू शिक्षकांना आर्थिक व इतर पद्धतीचे लाभ देण्यात येतील.

इ. सन २०२२ पर्यंत देशभरातून **'शिक्षक सेवक'** किंवा **'पॅरा टीचर्स'** (अपात्र, कंत्राटी शिक्षक) नियुक्त करण्याची प्रक्रिया बंद करण्यात येईल.

ई. **निरंतर शिक्षक व्यावसायिक विकास** अतिशय लवचिक व विभागवार रचना केलेल्या अभ्यासक्रमावर आधारित असेल. यामध्ये स्वतःला काय शिकायचे आहे आणि कशा प्रकारे शिकायचे आहे, हे शिक्षक ठरवू व निवडू शकतील. शिक्षकपदी नव्याने काम करावयास सुरुवात केलेल्या उमेदवारांसाठी खास ओळख सत्र (इंडक्शन) आयोजित करण्यात येईल व त्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन करण्याच्या प्रक्रिया अस्तित्वात आणल्या जातील. पसंतीनुरूप व्यावसायिक विकास करता यावा व प्रत्येक शिक्षकाच्या व्यावसायिक कारकिर्दीच्या आलेखाचे मूल्यमापन करता यावे यासाठी सर्व राज्यांनी तंत्रज्ञानावर आधारित प्रणाली अस्तित्वात आणावी. याचा अभ्यासक्रम ठरविण्याची कोणतीही मध्यवर्ती पद्धती नसेल तसेच कॅस्केड मॉडेल पद्धतीचे प्रशिक्षण नसेल आणि

कडक नियमदेखील नसतील. अशा कार्यक्रमामध्ये प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक काळजीपूर्वक निवडले जातील, त्यांना प्रभावीपणे प्रशिक्षण दिले जाईल आणि त्यांच्या भूमिकेमध्ये यासाठी कालावधी असेल.

उ. **शिक्षकांच्या कार्याचे सुलभीकरण** होण्यास्तव अपेक्षित विद्यार्थी – शिक्षक गुणोत्तरासोबतच पुरेशा पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर), सुविधा व अध्ययन साहित्य पुरविले जाईल. सर्व विद्यार्थी योग्य अध्ययन करीत आहेत की नाही याबाबत शिक्षकांना खातरजमा करता यावी म्हणून सर्व स्तरांवर दोषनिवारक कार्यक्रम (रिमेडिअल प्रोग्रॅम्स) निर्माण करण्यात येतील.

ऊ. शालेय कामकाजाच्या वेळेत शिक्षकांच्या **अध्यापनकार्यात कोणत्याही स्वरूपाचा व्यत्यय येता कामा नये**. (उदा. माध्यान्ह भोजन बनविणे, शाळेसाठी साहित्य जमविणे, इ.) उलटपक्षी, निष्कारण किंवा रजा मंजूर नसताना शाळेतून अनुपस्थित राहिल्यास शिक्षकांना जबाबदार धरण्यात येईल.

ऋ. प्रत्येक **मुख्याध्यापक आणि/किंवा शाळेचे प्राचार्य सुदृढ शालेय विकास प्रक्रिया व साहाय्यक शालेय संस्कृती निर्माण करण्यास** जबाबदार असतील. अशा प्रकारची संस्कृती शाळेमध्ये रुजण्यास साहाय्य व्हावे यास्तव शालेय व्यवस्थापन समितीस समजावून सांगण्यात येईल आणि शालेय शिक्षण संचालनालयातील अधिकारी याबाबत समितीच्या सदस्यांना उपयुक्त माहिती किंवा प्रशिक्षण देतील.

ऌ. सर्व विद्यार्थ्यांचा शिक्षण प्रवाहामध्ये समावेश होण्यास्तव शिक्षकांसाठी व शिक्षकांच्या प्रशिक्षकांसाठी भारतीय भाषांमधील **उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती** करण्यास प्राधान्य देण्यात येईल.

ऍ. सर्व विद्यमान शैक्षणिक साहाय्य संस्थांचे सबलीकरण करण्यासाठी काळजीपूर्वक नियोजन करून **शैक्षणिक साहाय्य संस्थांचे पुनरुज्जीवन** करण्यास प्राधान्य देण्यात येईल.

ऐ. अध्यापनकार्याची किमान विशिष्ट वर्षे पूर्ण केल्यानंतर त्या अनुभवाच्या जोरावर शिक्षक **शैक्षणिक प्रशासन किंवा शिक्षकांच्या प्रशिक्षणकार्यात** योगदान देऊ शकतील. दूरगामी विचार करता, सर्व शैक्षणिक प्रशासकीय पदे केवळ उत्तम शिक्षक असणाऱ्या व प्रशासनामध्ये रस असणाऱ्या उमेदवारांसाठीच राखीव ठेवण्यात येतील.

## ६. देशातील प्रत्येक मुलासाठी न्याय्य व सर्वसमावेशक शिक्षण

जन्म व कौटुंबिक पार्श्वभूमी यांच्याशी निगडित परिस्थितीमुळे भारतातील एकही मूल शिकण्याच्या व प्रगतीच्या कोणत्याही संधीला मुकू नये आणि भारतातील सर्व मुलांना लाभदायक ठरेल अशा प्रकारची शिक्षण प्रणाली घडविणे या धोरणाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

**उद्देश:** सर्व मुलांना अध्ययनाच्या व उत्कर्षाच्या समान संधी मिळाव्यात आणि सन २०३० पर्यंत सर्व लिंगाच्या व सामाजिक वर्गवारीच्या सहभागामध्ये व अध्ययनाच्या निष्पत्तीमध्ये समानता असावी या उद्देशाने एक सर्वसमावेशक व न्याय्य शिक्षण प्रणाली अस्तित्वात आणणे.

अ. **कमी प्रतिनिधित्व असणाऱ्या गटांमधील किंवा वंचित मुलांच्या बाबतीत** प्रारंभिक बाल्यावस्था शिक्षण, पायाभूत साक्षरता व अंकज्ञान, शालेय उपलब्धता, शालेय प्रवेश व उपस्थिती यांच्याशी निगडित असलेल्या धोरणातील कृतींकडे **विशेष लक्ष व साहाय्य** पुरविले जाईल.

आ. देशभरातून वंचित प्रदेशांमध्ये **विशेष शिक्षण झोन्स** उभारण्यात येतील. स्पष्ट सामाजिक विकास व सामाजिक आर्थिक निदर्शक (इंडिकेटर) यांच्या आधारे राज्यातील अशा प्रकारचे झोन्स घोषित करण्यासाठी राज्य शासनास प्रोत्साहित करण्यात येईल. तसेच राज्य शासनाने खर्च केलेल्या प्रत्येक रुपयास केंद्र शासन २:१ गुणोत्तरानुसार आर्थिक साहाय्य पुरवेल. कमी प्रतिनिधित्व असलेल्या गटांच्या किंवा वंचित गटांच्या समावेशाबद्दल सदर धोरणामध्ये नमूद केल्यानुसार या झोन्सनी नियोजित पद्धतीने कृती करणे आणि त्याबाबत केंद्र शासन व राज्य शासन यांनी संयुक्तरित्या कसून देखरेख करणे, ही महत्वपूर्ण कल्पना असेल.

इ. या धोरणातील काही **ठळक उपक्रम** पुढीलप्रमाणे आहेत: **शिक्षकांना** वारंवार प्रशिक्षण देऊन त्यांचे ज्ञान व कौशल्य अद्ययावत ठेवणे, शैक्षणिकदृष्ट्या कमी प्रतिनिधित्व असलेल्या गटांमधील किंवा वंचित गटांमधील शिक्षकांच्या भरतीसाठी पर्यायी मार्ग खुले करणे, ज्या शाळांमध्ये शैक्षणिकदृष्ट्या कमी प्रतिनिधित्व असलेल्या गटांमधील किंवा वंचित गटांमधील अध्ययनार्थींचे प्रमाण अधिक आहे तिथे **विद्यार्थी शिक्षक गुणोत्तर** २५:१ पेक्षा अधिक नसेल याची दक्षता घेणे, छळ, धमक्या व लिंग आधारित हिंसा याविषयी उपाययोजना करणारी यंत्रणा स्थापित करून **सर्वसमावेशक शालेय वातावरण** निर्माण करणे, बहिष्कार टाकण्याच्या कृती बंद पाडणे, सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने **अभ्यासक्रमांमध्ये** सुधारणा करणे.

ई. राष्ट्रीय शैक्षणिक माहिती संग्रहामध्ये (नॅशनल रिपॉझिटरी ऑफ एज्युकेशनल डेटा) प्रत्येक विद्यार्थ्यांची संपूर्ण व अद्ययावत माहिती जतन करण्यात येईल. केंद्रीय शैक्षणिक सांख्यिकी विभागाकडून (सेंट्रल एज्युकेशनल स्टॅटिस्टिक्स डिव्हिजन) सदर **माहितीचे विश्लेषण** करण्यात येईल.

उ. शिष्यवृत्त्या, कमी प्रतिनिधित्व असलेल्या गटांमधील किंवा वंचित गटांमधील विद्यार्थ्यांसाठी साधने व सुविधा विकसित करणे, सर्वसमावेशनासाठी आणि जिल्हे व संस्थांमध्ये प्रवेशासाठी विशेष आर्थिक साहाय्य व आधार

देणे अशा विधायक उपक्रमांकरिता खास निर्माण करण्यात आलेल्या राष्ट्रीय निधीमार्फत **वैयक्तिक विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य** या धोरणातून देण्यात येत आहे. साहाय्याच्या पर्यायी मार्गांमध्ये राष्ट्रीय अध्यापन कार्यक्रमामध्ये व दोषनिवारक सूचना साधन कार्यक्रमामध्ये भरती, माध्यान्ह भोजनासोबत अतिरिक्त नाश्ता आणि विशेष इंटर्नशिप संधी यांचा समावेश होतो. **सर्वसमावेशक शिक्षणावरील संशोधना**लाही आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

ऊ. शालेय शिक्षक व विद्यार्थिनींमधील **लिंग असमानतेवर** उपाययोजना करण्यासाठी महिलांचा सहभाग व मुलींना शिक्षण प्रदान करणे, शासनाने **आदिवासी, जातीनिहाय व धर्मनिहाय समूहांमधील** मुलांसाठी योजिलेले सर्व लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचत असल्याची दक्षता घेण्यासाठी त्यांना शिक्षण प्रदान करणे, **शहरी भागातील गरीब कुटुंबांमधील** विद्यार्थ्यांना योग्य जीवनमान मिळावे यासाठी त्यांना शिक्षण प्रदान करणे, **दिव्यांग** तसेच **तृतीयपंथी मुलांना** शिक्षण प्रदान करणे, यासोबतच परिसरातील शाळांमधील पायाभूत स्तरापासून ते इयत्ता बारावीपर्यंतच्या मुख्य प्रवाहातील मुलांवर निरंतर व आणखी उमेदीने लक्ष केंद्रित करणे, या बाबी सदर धोरणाची ठळक उद्दिष्टे आहेत.

## ७. शालेय संकुलाच्या माध्यमातून शालेय शिक्षणामध्ये अनुशासन

**उद्देश:** उपलब्ध साधने एकमेकांसोबत वाटून घेता यावीत व शालेय अनुशासन अधिक स्थानिक, प्रभावी व कार्यक्षम व्हावे या उद्देशाने शाळांना 'शालेय संकुलां'मध्ये गटबद्ध करण्यात आले आहे.

सध्या अनेक शासकीय शाळांना, विशेषतः छोट्या शाळांना, साधनांची टंचाई जाणवत असल्याची समस्या समोर आली आले. शालेय संकुलांची उभारणी केल्यामुळे हा प्रश्न निकालात निघेल. अनेक शाळांचे भौगोलिक स्थलांतर न करताही त्या एकाच संस्थात्मक व प्रशासकीय छताखाली आणल्या जातील. त्यामुळे मुलांसाठी कोणतीही तडजोड किंवा गैरसोय निर्माण न होता अतिशय प्रभावी व कार्यक्षम प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वात येईल.

अ. सन २०२३ पर्यंत राज्य शासन लोकसंख्येचे प्रमाण, संधानता (कनेक्टिव्हिटी) व इतर स्थानिक मुद्द्यांचा विचार करून **शाळांना विविध शालेय संकुलांमध्ये गटबद्ध** करेल. गटबद्ध करण्याच्या या उपक्रमामध्ये विद्यमान शाळांच्या अवस्थांचे पुनर्विलोकन करून ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या अतिशय कमी आहे (उदा. < २० विद्यार्थी) अशा शाळांचे विलीनीकरण करण्यात येईल. मात्र असे करताना मुलांना शाळेमध्ये ये-जा करण्यात कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून दळणवळणाची आवश्यक सुविधा पुरविण्यात येईल. या माध्यमातून राज्य शासनाला विद्यमान शाळांच्या अवस्थेची छाननी करण्याचीही संधी मिळेल.

आ. शालेय संकुलांमुळे मुख्य प्रवाहापासून थोड्याशा वेगळ्या पडलेल्या छोट्या शाळांचा अलगपणा नाहीसा होईल आणि शैक्षणिकदृष्ट्या व प्रशासकीयदृष्ट्या एकत्र काम करण्यासाठी व एकमेकांना साहाय्य करण्यासाठी **शिक्षकांचा व प्राचार्यांचा एक विशाल समुदाय निर्माण** होईल. शासकीय शालेय प्रणालीसाठी शालेय संकुल हे प्राथमिक प्रशासकीय युनिट असेल.

इ. एखादे विशिष्ट शालेय संकुल म्हणजे एकमेकांशी जोडल्या गेलेल्या किंवा एकसंध असलेल्या प्रदेशातील १०-२० शासकीय शाळांचा समूह असेल. त्या ठिकाणी शिक्षणाच्या पायाभूत स्तरापासून ते इयत्ता बारावीपर्यंतचे शिक्षण प्रदान करण्यात येईल. माध्यमिक शाळेचे प्राचार्य या शालेय संकुलाचे प्रमुख असतील.

ई. एखादे विशिष्ट शालेय संकुल म्हणजे एक असे **निम-स्वायत्त (सेमी ऑटोनॉमस) युनिट** असेल ज्यामध्ये शिक्षणाच्या पायाभूत स्तरापासून ते इयत्ता बारावीपर्यंतचे शिक्षण प्रदान करण्यात येईल. यामध्ये एक माध्यमिक शाळा (सेकंडरी स्कूल) असेल (इयत्ता नववी ते बारावी) आणि त्याच्या आसपास सर्व शासकीय शाळा मूलभूत/ प्राथमिक व माध्यमिक शालेय शिक्षण प्रदान करतील.

उ. शाळांना शालेय संकुलांमध्ये गटबद्ध केल्यामुळे विषयांचे शिक्षक, क्रीडा, संगीत व कला शिक्षक, समुपदेशक आणि समाजसेवक यांच्यासह **सर्व साधनसुविधा शाळांना एकमेकांसोबत गरजेनुसार वाटून घेणे शक्य** होईल. याशिवाय या एकीकरणामुळे प्रयोगशाळा, ग्रंथालये, आय. सी. टी. उपकरणे, संगीत वाद्ये, क्रीडा उपकरणे व

साहित्य, क्रीडांगणे, इत्यादी भौतिक साधनसामुग्रीही एकमेकांसोबत नियोजनबद्ध पद्धतीने वाटून घेणे शक्य येईल. परिणामी, सार्वजनिक साधनसुविधांचा इष्टतम विनियोग होईल.

ऊ. प्रारंभिक तीन वर्षांचे पायाभूत शिक्षण देणाऱ्या शाळा, व्यावसायिक शिक्षण व प्रौढ शिक्षण देणाऱ्या संस्था, शिक्षक साहाय्य संस्था व एकमेकांशी भौगोलिकदृष्ट्या जवळ असलेल्या किंवा जोडलेल्या परिसरातील दिव्यांग मुलांना साहाय्य देणे यांच्यासह सर्वांना एकमेकांच्या कामामध्ये साहाय्य करण्यासाठी सर्व प्रकारच्या **शैक्षणिक सुविधांचा संलग्न संच** तयार करणे, हा शालेय संकुल निर्मितीमागील महत्वपूर्ण उद्देश आहे. जिल्ह्यातील उच्च शिक्षण संस्थाही याबाबत सर्वतोपरी साहाय्य करतील. (उदा. शिक्षक व्यावसायिक विकासास साहाय्य करणे).

ऋ. प्रत्येक संकुलासाठी सर्वसमावेशक **शिक्षक विकास आराखडा** आखण्यात येईल आणि सहयोगी अध्ययन समुदाय जाणीवपूर्वक विकसित केले जातील व साप्ताहिक बैठका, शिक्षक अध्ययन केंद्रे अशा प्रक्रियांमधून त्याला शाश्वत ठेवण्यात येईल. यासोबत परिसंवाद (सेमिनार्स), वर्गातील देखरेखीतून मार्गदर्शन (इन क्लास मेन्टॉरिंग), अनुभव भेटी, इत्यादींमधून सातत्याने व्यावसायिक विकास घडवून आणण्यात येईल. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि ब्लॉक व क्लस्टर रिसोर्स सेंटर्स यांच्यासह शैक्षणिक व शिक्षक साहाय्य प्रणालीही शालेय संकुल प्रणालीशी सुसंगत करण्यात येईल.

ऌ. प्रत्येक शालेय संकुलामध्ये एक **शालेय संकुल व्यवस्थापन समिती** असेल ज्यामध्ये संकुलातील सर्व शाळांचे व त्यासोबत प्रौढ शिक्षण केंद्र, गट साधन केंद्र (क्लस्टर रिसोर्स सेंटर) इत्यादींसह संकुलाशी संलग्न असणाऱ्या इतर संस्थांचे प्रतिनिधीही असतील. शाळेच्या वतीने राज्य शासन व तिच्या समित्या यांच्या कामकाजामध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार या समितीला असेल. सदर समिती शिक्षकांच्या कामगिरीच्या मूल्यमापनामध्येही मोलाची व मध्यवर्ती भूमिका पार पाडेल.

ऍ. प्रारंभी प्रत्येक शाळा स्वतःचा विकास आराखडा तयार करेल. त्यावरून **शालेय संकुलाचा विकास आराखडा** आखण्यात येईल आणि तत्पश्चात, त्याला शालेय शिक्षण विभागाकडून अनुमोदन देण्यात येईल. शालेय प्रणालीच्या देखरेखीसाठी व त्यांचे कार्य सुरळीत होऊन त्यांच्या सबलीकरणासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये **डिस्ट्रिक्ट एज्युकेशन कौन्सिल/ जिल्हा शिक्षण परिषद** स्थापन करण्यात येईल.

## ८. शालेय शिक्षणाचे विनियमन

**उद्देश:** शालेय शिक्षणामध्ये सचोटी व पारदर्शकता रहावी, आणि शैक्षणिक निष्पत्तीमध्ये निरंतर सुधारणा व्हावी या हेतूने शिक्षणप्रणालीच्या गुणवत्तेला व अभिनव उपक्रमांना चालना देण्यासाठी प्रभावी विनियमन व प्रमाणन (ॲक्रेडीटेशन) यंत्रणा राबवून भारतीय शालेय शिक्षण प्रणालीमध्ये नवचैतन्य आणणे.

विनियमन शैक्षणिक सुधारणेचे साधन बनले पाहिजे आणि त्यामुळे भारतीय शाळेत शिक्षण प्रणालीस उर्जितावस्था आली पाहिजे.

अ. संघर्ष स्वारस्य टाळता यावे या हेतूने शाळांचे विनियमन व प्रचालन (ऑपरेशन्स) स्वतंत्र समितीकडून करण्यात येईल. **धोरणनिश्चिती, विनियमन, प्रचालन व शैक्षणिक बाबींकरिता सुस्पष्ट, स्वतंत्र प्रणाली** अस्तित्वात असेल.

आ. प्रत्येक राज्यासाठी **राज्य शालेय नियंत्रण प्राधिकरण (स्टेट स्कूल रेग्युलेटरी ऑथॉरिटी)** नावाची अर्ध न्यायिक अधिकार स्वरूपाची स्वतंत्र राज्यव्यापी नियंत्रण समिती निर्माण करण्यात येईल, तर संपूर्ण राज्यातील शासकीय शालेय प्रणालीचे प्रचालन शालेय शिक्षण संचालनालयाकडून सांभाळले जाईल.

इ. **सदर विनियमन** शालेय गुणवत्ता मूल्यमापन व मान्यता आराखडा (स्कूल क्वॉलिटी ॲसेसमेंट अँड ॲक्रेडीटेशन फ्रेमवर्क) याला अनुसरून असलेल्या **मान्यता प्रणालीवर आधारित** असेल. सदर आराखडा केवळ मूलभूत निकषांबाबत उपाययोजना करेल आणि शाळा सुरु करण्याची अनुज्ञप्ती कळवेल. शाळा स्वमान्यता घेतील आणि लेखा परीक्षा करण्यासाठी यंत्रणा उभारण्यात येईल. वरील प्रक्रिया शासकीय व खाजगी अशा दोन्ही स्वरूपाच्या शाळांना लागू राहील.

ई. विनियमनाची अंमलबजावणी सध्याच्या निरीक्षण दृष्टिकोनातून (इंस्पेक्टोरियल ॲप्रोच) करण्यात येणार नाही. त्याऐवजी शाळांसंबंधित सर्व इत्यंभूत माहिती सार्वजनिक क्षेत्रात उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थ्यांचे **पालकच वस्तुतः या विनियमनाचे नियंत्रक** राहतील.

उ. राज्यातील शाळांसाठी आवश्यक असलेली मानकांची रचना व अभ्यासक्रम यांच्यासह सर्व शैक्षणिक बाबी 'राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद' यांच्याकडून कार्यान्वित होतील. शालेय स्तरावरील (शाळा सोडेपर्यंत) घेण्यात येणाऱ्या क्षमता परीक्षांच्या प्रमाणपत्रांसाठीच्या बाबी प्रमाणपत्र/परीक्षा मंडळांकडून हाताळल्या जातील आणि ते याकरिता आवश्यक अर्थपूर्ण परीक्षाही घेतील. मात्र, (पाठ्यपुस्तकांसह) अभ्यासक्रम ठरविण्यामध्ये त्यांची कोणतीही भूमिका नसेल.

ऊ. **खाजगी परोपकारी भावनेतून चालविण्यात येणाऱ्या शाळांच्या** सत्कार्याला प्रोत्साहन देण्यात येईल आणि त्यांच्याबाबत विनियमनाचा भार कमी करण्यात येईल. त्याचबरोबर व्यावसायिक स्वरूपात आर्थिक लाभ मिळविण्याच्या उद्देशाने शाळा चालविणाऱ्या खाजगी शाळाचालकांना मज्जाव करण्यात येईल.

ऋ. **शासकीय व खाजगी शाळा यांचे एकसमान निकष, मापदंड व प्रक्रिया यांच्या आधारे विनियमन** करण्यात येईल. त्याचसोबत जनहितार्थ खाजगी शाळांना आणि खाजगी परोपकारी उपक्रमांना प्रोत्साहन देण्यात येईल.

ऌ. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद प्रत्येक राज्यासाठी **शालेय गुणवत्ता मूल्यमापन व मान्यता आराखडा** विकसित करेल. राज्य शालेय नियंत्रण प्राधिकरण (स्टेट स्कूल रेग्युलेटरी ऑथॉरिटी) मान्यतेच्या प्रणालीवर आधारित विनियमन करण्यासाठी वरील आराखड्याचा वापर करेल.

ऍ. शाळा व शालेय संस्था यांना अभ्यासक्रम निवडण्याची लवचिकता व स्वातंत्र्य असेल. मात्र, निवडण्यात येणारे अभ्यासक्रम राष्ट्रीय/ राज्यस्तरीय अभ्यासक्रम आराखड्याशी सुसंगत असले पाहिजेत.

ऎ. सर्व समित्या व संस्था वार्षिक तसेच मध्यकालीन (३-५ वर्षे) मुदतीचे आराखडे बनवतील. संबंधित उच्च नियामक मंडळाकडून रीतसर पुनर्विलोकन प्रक्रिया निर्माण करण्यात येईल.

ए. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून नमुना तत्त्वावर विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तराचे **'राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण' (नॅशनल अचिव्हमेंट सर्व्हे)** करण्याची प्रक्रिया तशीच चालू राहील. राज्य शासनदेखील जनगणनेवर आधारित 'राज्य संपादणूक सर्वेक्षण' (स्टेट अचिव्हमेंट सर्व्हे) करू शकते.

ऐ. **'शिक्षणाचा अधिकार'** शालेय विनियमन व अनुपालन यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा वैधानिक घटक असल्यामुळे त्याचे **पुनर्विलोकन** करण्यात येईल आणि सदर धोरण सक्षम करण्यासाठी व तो अधिनियम अस्तित्वात आल्यानंतर त्यापासून मिळालेल्या शिकवणीवर आधारित नियोजित सुधारणा अंमलात आणण्यासाठी **अधिनियमामध्ये योग्य सुधारणा** करण्यात येतील.

# उच्च शिक्षण

## १. नवीन संस्थात्मक पायाभूत सुविधा (आर्किटेक्चर)

**उद्देश:** उच्च शिक्षण प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल करणे, देशभरात जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्था निर्माण करणे - सन २०३५ पर्यंत ग्रॉस एनरोलमेंट रेशो किमान ५०% पर्यंत वाढविणे.

विशाल, सर्वसाधनसमृद्ध, चैतन्यमय बहुविध शाखांनी सुसज्ज संस्थांद्वारे उच्च शिक्षणासाठी नवीन दूरदृष्टी व संरचना (आर्किटेक्चर) परिकल्पित करण्यात आली आहे. सध्या अस्तित्वात असलेली ८०० विद्यापीठे व ४०,००० महाविद्यालये सुमारे १५,००० उत्कृष्ट संस्थांमध्ये संकलित करण्यात येईल.

अ. नवीन उच्च शिक्षण पायाभूत सुविधा (आर्किटेक्चर) अध्यापन व संशोधनासाठी **विशाल, सर्वसाधनसमृद्ध, चैतन्यमय बहुविध शाखांनी सुसज्ज असलेल्या स्वायत्त संस्थांची** उभारणी करेल. यामुळे उच्च शिक्षण देशात सर्वदूर पोहोचेल व शैक्षणिक संस्थांची क्षमता वाढेल आणि त्याचसोबत सबळ शैक्षणिक समुदायाची निर्मिती होईल. विविध विषय व क्षेत्रांशी निगडित अभ्यासक्रम उपलब्ध असलेल्या या उच्च शिक्षण संस्था बहुविध शाखांनी सुसज्ज असतील.

आ. विशिष्ट उद्देशानुसार निर्माण करण्यात येणाऱ्या उच्च दर्जाच्या **तीन प्रकारच्या संस्था** अस्तित्वात येतील:

- प्रकार १ – यामध्ये जागतिक दर्जाचे संशोधन व सर्व शाखांसाठी उच्च दर्जाचे अध्यापन करण्यात येईल.
- प्रकार २ – यामध्ये सर्व शाखांसाठी उच्च दर्जाचे अध्यापन करण्यासोबत संशोधनामध्ये महत्वपूर्ण योगदान देण्यात येईल.
- प्रकार ३ – यामध्ये सर्व शाखांसाठी उच्च दर्जाचे अध्यापन करताना पदवीपूर्व (अंडरग्रॅज्युएट) शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यात येईल.

इ. विद्यमान संस्थांचे एकीकरण व पुनर्रचना करून आणि सोबत काही नवीन संस्था निर्माण करून सदरील पुनर्रचना अतिशय पद्धतशीरपणे व काळजीपूर्वक करण्यात येईल. नवीन संस्थात्मक शिक्षण पायाभूत सुविधेच्या (आर्किटेक्चरच्या) उत्प्रेरणासाठी **'नालंदा अभियान' (मिशन नालंदा) व 'तक्षशिला अभियान' (मिशन तक्षशिला)** सुरु करण्यात येतील. या अभियानांचा भाग म्हणून कार्यास गतिशीलता आणणाऱ्या काही संस्था, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ लिबरल आर्टस्/बहुशाखीय शिक्षण व संशोधन विद्यापीठे यांचीही उभारणी करण्यात येऊ शकते.

ई. सर्व संस्था **विद्यापीठे** असतील किंवा **पदवी प्रदान करणारी स्वायत्त महाविद्यालये** असतील.

उ. सार्वजनिक क्षेत्रातील उच्च शिक्षणाचा विस्तार व पुनरुज्जीवन होण्याच्या दृष्टीने अतिशय रास्त व पारदर्शक प्रणालीद्वारे **सार्वजनिक क्षेत्रातून मोठी गुंतवणूक** करण्यात येईल.

ऊ. **दुर्लक्षित किंवा वंचित भौगोलिक क्षेत्रांमध्ये** उच्च दर्जाच्या संस्थांची उभारणी प्राधान्यक्रमी असेल.

ऋ. ही नवीन संस्थात्मक पायाभूत सुविधा (आर्किटेक्चर) व्यावसायिक क्षेत्रांसह सर्व क्षेत्रांना सामावून घेईल.

## २. उच्च दर्जाचे उदारमतवादी शिक्षण

**उद्देश:** उच्च शिक्षणासाठी निवडलेल्या शाखेमध्ये, विषयामध्ये व क्षेत्रामध्ये सखोल विशेष ज्ञान आत्मसात करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया रचण्याच्या उद्देशाने अधिक कल्पक व विस्तृत स्वरूपाच्या उदारमतवादी शिक्षणाकडे वाटचाल करणे.

सर्व पदवीपूर्व (अंडरग्रॅज्युएट) अभ्यासक्रमांमध्ये उदारमतवादी शिक्षणाचा दृष्टिकोन एक प्रमुख वैशिष्ठ्य असेल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया रचण्याच्या उद्देशाने अधिक कल्पक व लवचिक अभ्यासक्रम, अभ्यासाच्या विविध शाखांचे व विषयांचे कल्पक मिश्रण व एकीकरण केलेल्या कार्यक्रमामध्ये अनेक आगमन व बहिर्गमन मार्गांचा (एंट्री व एक्झिट पॉईंट्स) समावेश असेल.

अ. घटनात्मक मूल्ये विकसित करण्याच्या हेतूने विस्तृत बहुशाखीय अनुभव व संधी देणारे **उदारमतवादी शिक्षण** उच्च शिक्षणाचा पाया असेल. यातूनच विद्यार्थ्यांमध्ये महत्वाच्या जीवन क्षमता, विषयांची सखोल जाण व समाजाशी नैतिक बांधिलकीचा भाव विकसित होईल. पदवीपूर्व (अंडरग्रॅज्युएट) स्तरावर पेशाविषयक व व्यावसायिक क्षेत्रांसह सर्व प्रकारच्या शाखांसाठी, कार्यक्रमांसाठी व क्षेत्रांसाठी हाच दृष्टिकोन असेल.

आ. केंद्र शासन 'इंडियन इन्स्टिट्यूट्स ऑफ टेक्नॉलॉजी'च्या (आयआयटी) धर्तीवर दहा 'इंडियन इन्स्टिट्यूट्स ऑफ लिबरल आर्टस्'/'बहुशाखीय शैक्षणिक व संशोधन विद्यापीठां'ची उभारणी करेल.

इ. **अभ्यासक्रमाच्या कल्पक व लवचिक रचनेमुळे** अभ्यासाच्या विविध शाखांचे व विषयांचे कल्पक मिश्रण निर्माण करणे शक्य होईल आणि विद्यार्थ्यांना अनेक उपयुक्त आगमन व बहिर्गमन मार्ग (एंट्री व एक्झिट पॉईंट्स) प्राप्त होतील. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेली एकसुरी, चाकोरीबद्ध अभ्यासक्रमांची पद्धत मोडीत काढता येईल आणि आजीवन शिकण्याच्या शक्यता निर्माण करता येतील. पदवी (मास्टर्स व डॉक्टरेट) स्तरीय शिक्षण सखोल संशोधनावर आधारित विशेषज्ञता (स्पेशलायझेशन) उपलब्ध करून देईल.

ई. पदवीपूर्व (अंडरग्रॅज्युएट) पदवीचा कालावधी ३ ते ४ वर्षांचा असू शकेल. यादरम्यानच्या कालावधीत संस्था विद्यार्थ्यांना योग्य प्रमाणपत्र प्रदान करून **अनेक बहिर्गमन मार्ग (एक्झिट पॉईंट्स) व संधी** उपलब्ध करून देऊ शकतात. (पेशाविषयक व व्यावसायिक क्षेत्रांसह) कोणत्याही शाखेचा किंवा क्षेत्रांचा २ वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर 'प्रगत पदविका' (ऍडव्हान्स्ड डिप्लोमा) किंवा १ वर्ष अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र प्रदान करू शकते.

उ. ४ वर्षांचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उदारमतवादी शिक्षणाचा चौफेर व सखोल अभ्यास करण्याची सुवर्णसंधी देईल. प्रमुख व दुय्यम विषय निवडीनुसार (मेजर व मायनर) या अभ्यासक्रमाला **'बॅचलर ऑफ लिबरल आर्टस्'** असे संबोधण्यात येईल. ३ वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर 'बॅचलर' पदवी मिळेल. विद्यार्थ्याने जर संबंधित विषयामध्ये संशोधन कार्य केले असल्यास त्याला दोन्ही अभ्यासक्रमांमध्ये 'ऑनर्स'सह पदवी मिळू शकते.

ऊ. काही विशिष्ट व्यावसायिक शाखांमध्ये (उदा. शिक्षक शिक्षण, अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र, विधी) पदवीपूर्व (अंडरग्रॅज्युएट) पदवी अभ्यासक्रमामध्ये केवळ ४ वर्षांचा (किंवा त्याहून अधिक कालावधीचा) अभ्यासक्रम उपलब्ध असू शकतो.

ऋ. संस्थांना पदव्युत्तर (मास्टर्स) अभ्यासक्रमाच्या रचनेमध्ये विविध पर्याय प्रदान करण्याची मुभा असेल. उदा. काही बाबतीत २ वर्षांचा अभ्यासक्रम असेल ज्यामध्ये दुसरे वर्ष पूर्णत: संशोधनामध्ये व्यतीत केले जाईल, ज्यांनी ३ वर्षांचा पदविका (अंडरग्रॅज्युएट) अभ्यासक्रम पूर्ण केला असेल, ५ वर्षांचा एकीकरण केलेला पदव्युत्तर (मास्टर्स) अभ्यासक्रम असू शकेल, आणि ४ वर्षांचा पदविका (अंडरग्रॅज्युएट) अभ्यासक्रम 'ऑनर्स'सह पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी केवळ १ वर्षाचाच पदव्युत्तर (मास्टर्स) अभ्यासक्रमही उपलब्ध असेल.

ऌ. पीएच. डी. करिता प्रवेश घेण्यासाठी पदव्युत्तर (मास्टर्स) पदवी किंवा ४ वर्षांचा पदविका (अंडरग्रॅज्युएट) अभ्यासक्रम 'ऑनर्स'सह पूर्ण केलेला असणे आवश्यक असेल. एम्. फिल. अभ्यासक्रम बंद करण्यात येईल.

## ३. अध्ययनास पोषक वातावरण निर्माण करणे

**उद्देश:** अभ्यासक्रम आनंददायी, सखोल व परस्परसंवादी असेल, अध्यापनशास्त्र विद्यार्थ्यांना विषयाशी बांधून ठेवणारे व प्रभावी असेल आणि विद्यार्थ्यांना अध्ययनक्रियेतून अधिकाधिक निष्पत्ती व्हावी व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी त्यांची काळजी घेणारे मदतशील वातावरण राहील, याची दक्षता घेणे.

उच्च शिक्षणातील अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र पारंपरिक घोकंपट्टीवर आधारित यांत्रिक प्रक्रियेनुसार शिक्षण देणारे नसेल. त्यामुळे तरुण लोकांना लोकशाहीतील जागरूक नागरिक व कोणत्याही क्षेत्रातील यशस्वी व्यावसायिक अशा दुहेरी भूमिकेतून समाजासाठी योगदान देता येईल.

अ. **'राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखडा' ('नॅशनल हायर एज्युकेशन क्वॉलिफिकेशन्स फ्रेमवर्क')** अतिशय चैतन्यमय व सखोल अभ्यासक्रम विकसित करेल. त्यामध्ये विविध क्षेत्रात व विषयात प्रदान करण्यात येणाऱ्या पदवी/पदविका/प्रमाणपत्र यांच्याशी निगडित अध्ययन निष्पत्ती साकारण्यात येईल. शैक्षणिक, व्यावसायिक व पेशाविषयक क्षेत्रांमध्ये समानता व गतिशीलता आणण्यासाठी वरील आराखडा 'राष्ट्रीय कौशल्ये पात्रता आराखड्या'शी ('नॅशनल स्किल्स क्वॉलिफिकेशन्स फ्रेमवर्क') संलग्न करण्यात येईल.

आ. **पसंतीनुरूप क्रेडिट प्रणाली**मध्ये (**चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टिम**) बदल करण्यात येईल आणि त्यामध्ये लवचिकता व नाविन्य यावे यासाठी आवश्यक सुधारणा करण्यात येईल.

इ. प्रभावी अध्यापनशास्त्रीय पद्धतींमधून उत्तेजनावर्धक अध्ययन अनुभव प्रदान करण्यात येतील; तसेच सर्व विद्यार्थ्यांनादेखील सामाजिक प्रतिबद्धतेच्या अर्थपूर्ण संधी प्रदान करण्यात येतील. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केवळ शैक्षणिक निकषांवर न करता त्यांची व्यापक क्षमता व स्वभाव गुणधर्मही पाहिले जातील.

ई. शिक्षणाची फलश्रुती अधिक सरस व्हावी म्हणून विद्यार्थ्यांसाठी **शैक्षणिक, आर्थिक** व **भावनिक साहाय्य** सदैव उपलब्ध राहील.

उ. **खुले शिक्षण व दूरस्थ शिक्षणाच्या (डिस्टन्स लर्निंग)** कक्षा रुंदावण्यात येतील. ही बाब ग्रॉस एनरोलमेंट रेशो ५०% पर्यंत वाढविण्यामध्ये मोलाची भूमिका बजावेल. ऑनलाईन अंकीय संग्रह (ऑनलाईन डिजिटल रिपॉझिटरी), संशोधनासाठी अर्थसाहाय्य, सुधारित विद्यार्थी सेवा, एमओओसी यांना गुणांकनानुसार देण्यात येणारी मान्यता, इत्यादी उपाययोजना करून अशा प्रकारचे शिक्षण वर्गांतर्गत शिकविल्या जाणाऱ्या सर्वोच्च दर्जाच्या शिक्षणपद्धतींच्या बरोबरीचे राहील, याची दक्षता घेण्यात येईल.

ऊ. संस्थात्मक सहकार्य, आणि विद्यार्थी व अध्यापक यांच्यातील गतिशीलता याद्वारे शिक्षणाचे **आंतरराष्ट्रीयीकरण** साधण्यात येईल. निवडक भारतीय विद्यापीठांमध्ये आंतरराष्ट्रीय शिक्षणासाठी आंतरविद्यापीठ केंद्राची स्थापना करण्यात येईल.

## ४. उत्साही, सहभागी होणारे व सक्षम अध्यापक

**उद्देश:** उच्च सक्षमता व दृढ बांधिलकी असलेले आणि अध्यापन व संशोधनामध्ये सर्वोत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी उत्साही असलेले सबळ अध्यापक वर्ग निर्माण करणे

उच्च शिक्षण संस्थांच्या यशामधील सर्वात महत्वाचा व निर्णायक पैलू म्हणजे अध्यापकांचा दर्जा व सहभाग. सदर धोरण अध्यापकांना पुन्हा एकदा उच्च शिक्षणाच्या केंद्रस्थानी स्थानापन्न करते.

अ. प्रत्येक संस्थेकडे पुरेसा अध्यापक वर्ग असेल. त्याद्वारे सर्व कार्यक्रम, अभ्यासक्रम, विषय व क्षेत्र यांच्या गरजा भागविल्या जातील, अपेक्षित विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर (३०:१) राखण्यात येईल आणि अध्यापकवर्गामध्ये वैविध्य राखण्यात येईल.

आ. आजवर तासिका तत्वावर, अभ्यागत किंवा कंत्राट पद्धतीने करण्यात येणारी अध्यापकांची नियुक्ती ताबडतोब बंद करण्यात येईल.

इ. अध्यापकांची भरती त्यांचे शैक्षणिक नैपुण्य, अध्यापनाच्या क्षमता व सार्वजनिक क्षेत्रामध्ये समाजसेवेसाठी असलेला त्यांचा कल यांच्यावर आधारित असेल.

ई. योग्य पद्धतीने साकारलेली कायमस्वरूपी रोजगार (कालावधी) अनुचिन्हन प्रणाली (पर्मनंट एम्प्लॉयमेंट (टेनॉर) ट्रॅक सिस्टिम) अंमलात आणण्यात येईल. सन २०३० पर्यंत सदर प्रणाली खाजगी संस्थांसह देशातील सर्व संस्थांमध्ये पूर्णतः कार्यान्वित करण्यात येईल.

उ. अध्यापकांना त्यांच्या कोर्सेससाठी अभ्यासक्रमाचे पर्याय निवडण्यासाठी व शैक्षणिक स्वातंत्र्यानुसार संशोधन करण्यासाठी सक्षम करण्यात येईल.

ऊ. सर्व संस्था अध्यापकांसाठी निरंतर व्यावसायिक विकास आराखडा विकसित करतील आणि त्या आराखड्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया ठरवतील. सदर आराखड्यामध्ये क्षेत्र/विषय यांमध्ये क्षमता विकास, अध्यापनशास्त्रीय क्षमता, संशोधन व पद्धतींमधील योगदान यांचा समावेश असावा.

ऋ. अध्यापक भरती व विकास, कारकीर्द श्रेणीबदल, मानधन व्यवस्थापन या बाबी प्रत्येक संस्थेच्या संस्थात्मक विकास आराखड्याचा भाग असतील.

## ५. सबळ अनुपालन व स्वायत्तता

**उद्देश:** सक्षम व नैतिक मूल्याधिष्ठित नेतृत्वाने प्रणित स्वतंत्र, स्वयंशासित उच्च शिक्षण संस्था निर्माण करणे

उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी व संशोधनासाठी पोषक सुसंस्कृत वातावरणामध्ये बौद्धिक क्षोभ होणे आवश्यक असते - हे सुसंस्कृत वातावरण उच्च शिक्षण प्रदान करणाऱ्या संस्थांचे अनुशासन ठरवते.

अ. उच्च शिक्षण संस्थांचे अनुशासन संपूर्ण शैक्षणिक व प्रशासकीय स्वायत्तता असलेल्या **स्वतंत्र मंडळांकडून** केले जाईल. सदर मंडळ, तिचे अध्यक्ष व कुलगुरू/संचालक (प्रमुख कार्यकारी अधिकारी) यांची निर्मिती व नियुक्ती अनुशासनामध्ये शासनासह इतर कुणाचाही होऊ शकणारा कोणत्याही प्रकारचा संभाव्य बाह्य हस्तक्षेप टाळण्यासाठी उपयुक्त ठरेल, आणि त्यामुळे संस्थेशी पराकोटीची वचनबद्धता असलेल्या उच्च क्षमतेच्या लोकांची संस्थेशी असलेली बांधिलकी वृद्धिंगत करेल.

आ. सर्व उच्च शिक्षण संस्था **स्वायत्त स्वयंशासित संस्था** असतील आणि ‘मान्यता’ (ॲफिलिएशन) प्रदान करण्याची पद्धत बंद करण्यात येईल. ‘मान्यताप्राप्त महाविद्यालयां’ना स्वायत्त पदवी प्रदान करणारी महाविद्यालये या अर्थी विकसित करण्यासाठी आवश्यक साहाय्य केले जाईल आणि ‘मान्यताप्राप्त विद्यापीठे’ चैतन्यमय बहुशाखीय संस्थांमध्ये विकसित करण्यात येतील.

इ. विनियमन निकषांनुसार **खाजगी व सरकारी संस्थांना एकसमान मानण्यात येईल**. शिक्षणाचे व्यापारीकरण थांबविले जाईल आणि परोपकारी वृत्तीने शिक्षणप्रसार करण्यास प्रयत्नशील असणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना उत्तेजन दिले जाईल.

ई. शिक्षण प्रणाली – तिची संस्कृती, रचना व यंत्रणा – यांमध्ये **स्वायत्तता खोलवर रुजविली जाईल**. अध्यापकांना अध्यापनशास्त्राचा दृष्टिकोन, विद्यार्थी मूल्यमापन व संशोधन यांच्यासह इतर शैक्षणिक बाबींमध्ये स्वातंत्र्य दिले जाईल व अभ्यासक्रमाबाबत सबलीकरण केले जाईल. संस्थांना शैक्षणिक व प्रशासकीय स्वायत्तता असेल. यामध्ये नवीन कार्यक्रम, उपक्रम सुरु करणे व राबविणे, अभ्यासक्रम ठरविणे, विद्यार्थी प्रवेश संख्या ठरविणे, साधनांच्या गरजा ठरविणे, आणि अनुशासन व व्यक्ती व्यवस्थापन प्रणालीसह स्वतःच्या अंतर्गत प्रणाली विकसित करण्याचा समावेश असेल. उच्च शिक्षण संस्था खऱ्या अर्थी स्वायत्त, स्वतंत्र व स्वयंशासित संस्थांमध्ये विकसित करण्यात येतील.

## ६. विनियमनाच्या प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल

**उद्देश:** उच्च शिक्षणामध्ये सर्वोत्तम कामगिरी व सामुदायिक उत्साहवर्धन होण्यास चालना मिळावी या उद्देशाने प्रभावी, सक्षम बनविणारे व परस्परसंवादी विनियमन अस्तित्वात आणणे

अ. **प्रमाणन, अर्थसहाय्य, मान्यताप्राप्ती व विनियमन** ही कार्ये वेगवेगळी करण्यात येतील आणि सदर कार्ये **स्वतंत्र मंडळांकडून करण्यात येतील**. यामुळे सत्तेचे केंद्रीकरण व स्वारस्यसंघर्ष टाळता येईल.

आ. व्यावसायिक शिक्षणासह सर्व प्रकारच्या उच्च शिक्षणासाठी केवळ **राष्ट्रीय उच्च शिक्षण नियंत्रण प्राधिकरण (नॅशनल हायर एज्युकेशन रेग्युलेटरी ऑथॉरिटी)** ही एकच नियंत्रण यंत्रणा असेल. सर्व विद्यमान नियंत्रण मंडळांचे रूपांतर व्यावसायिक प्रमाणन मंडळांमध्ये (प्रोफेशनल स्टॅंडर्ड सेटिंग बॉडीज) करण्यात येईल.

इ. सध्याच्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युनिव्हर्सिटी ग्रॅन्ट कमिशन) रूपांतर उच्च शिक्षण अनुदान परिषदेमध्ये (हायर एज्युकेशन ग्रॅन्ट कौन्सिल) करण्यात येईल.

ई. ‘सामान्य शिक्षण परिषदे’ची स्थापना करण्यात येईल आणि उच्च शिक्षणाचे ‘पदवी गुणधर्म’ म्हणजेच ‘अपेक्षित अध्ययन निष्पत्ती’ परिभाषित करण्यासाठी या परिषदेकडून ‘राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखडा’ (‘नॅशनल हायर एज्युकेशन क्वॉलिफिकेशन्स फ्रेमवर्क’) विकसित करण्यात येईल.

उ. **मूलभूत निकषांवर आधारित मान्यता विनियमनासाठी आधारभूत** असेल. ‘राष्ट्रीय मूल्यमापन व मान्यता परिषद’ (नॅशनल ऍसेसमेंट अँड ऍक्रेडीटेशन कौन्सिल) मान्यता प्रदान करणाऱ्या संस्थांची संपूर्ण साखळी विकसित करेल व पूर्ण प्रक्रियेची देखरेख करेल.

ऊ. **शासकीय व खाजगी उच्च शिक्षण संस्थांसाठी एकच सामायिक नियंत्रण पद्धती** असेल. **खाजगी क्षेत्रातून परोपकारी वृत्तीने पुढाकार** घेणाऱ्या संस्थांना प्रोत्साहित केले जाईल.

ऋ. नियंत्रण प्रणालीमध्ये राज्य शासनातील उच्च शिक्षण विभागाचा धोरणस्तरावर समावेश असेल. राज्य उच्च शिक्षण परिषद सदर नियंत्रण प्रणालीला आवश्यक साहाय्य पुरवेल व स्वतःकडील सर्वोत्तम कार्यपद्धतींची देवाणघेवाण करेल.

# शिक्षक शिक्षण

## १. शिक्षकांची कसून पूर्वतयारी

**उद्देश:** शिक्षक शिक्षण प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल करून बहुशाखीय महाविद्यालयांमध्ये व विद्यापीठांमध्ये शिक्षक शिक्षण प्रणाली राबवून आणि सर्व शालेय शिक्षकांसाठी चार वर्षांचा एकीकृत केलेला बॅचलर पदवी अभ्यासक्रम अस्तित्वात आणून शिक्षकांना साहित्य, अध्यापनशास्त्र व सराव यांमध्ये सर्वोच्च दर्जाचे प्रशिक्षण दिले जात असल्याची दक्षता घेणे.

अध्यापन हा नैतिकदृष्ट्या व बौद्धिकदृष्ट्या अतिशय आव्हानात्मक व्यवसाय आहे. नवीन शिक्षकांना प्रचंड मेहनत घेऊन कसून पूर्वतयारी करावी लागते आणि शिक्षकी पेशामध्ये असलेल्या व्यक्तींना निरंतर व्यावसायिक विकास आणि शैक्षणिक व व्यावसायिक साहाय्य गरजेचे असते.

अ. शिक्षकांच्या तयारीसाठी **४ वर्षांचा एकीकृत केलेला बॅचलर ऑफ एज्युकेशन कार्यक्रम** बहुशाखीय संस्थांमध्ये पदवीपूर्व अभ्यासक्रमाद्वारे प्रदान करण्यात येईल. सदर अभ्यासक्रमामध्ये शैक्षणिक विषय व शिक्षक तयारी अभ्यास या दोहोंचा समावेश असेल. स्तरनिहाय व विषयनिहाय असलेला हा अभ्यासक्रम शालेयपूर्व (प्री-स्कूल) पासून माध्यमिक स्तर (इयत्ता बारावी) या इयत्तांसाठी आवश्यक असलेल्या कला व क्रीडा यांच्यासह सर्व विषयांसाठी शिक्षकांची पूर्वतयारी करून घेईल. व्यावसायिक शिक्षण किंवा विशेष शिक्षण यांचाही या अभ्यासक्रमात समावेश असेल.

आ. ४ वर्षांचा बी. एड्. अभ्यासक्रम इतर पदवीपूर्व पदवीसमान असेल आणि ४ वर्षांचा बी. एड्. अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी पदव्युत्तर (मास्टर्स पदवी) अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यास पात्र राहतील.

इ. सध्याचा २ वर्षांचा बी. एड्. अभ्यासक्रम सन २०३० पर्यंत कायम राहील. सन २०३० नंतर केवळ ४ वर्षांचा बी. एड्. अभ्यासक्रम प्रदान करणाऱ्या संस्थांनाच २ वर्षांचा अभ्यासक्रम प्रदान करता येईल. कोणतीही एखादी पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम प्रदान करण्यात येतील.

ई. सन २०३० नंतर इतर कोणत्याही प्रकारचे पूर्व-सेवा शिक्षक तयारी अभ्यासक्रम प्रदान करण्यात येणार नाहीत.

उ. शिक्षक शिक्षण केवळ **बहुशाखीय संस्थांमध्येच** प्रदान करण्यात येईल. शैक्षणिक दृष्टिकोन, विषय व अध्यापनशास्त्र यांच्या सखोल सैद्धांतिक आकलनासाठी, तसेच सैद्धांतिक ज्ञान व प्रात्यक्षिक ज्ञान यांच्यातील परस्परमेळ दृढ होण्यासाठी विविध विषयांमधील उत्तम प्रतीच्या पूर्व-सेवा शिक्षक तयारीला नैपुण्याची गरज असते. याकरिता शिक्षणाच्या मुख्य क्षेत्रांमध्ये व इतर सर्व शैक्षणिक विषयांमध्ये विविध तऱ्हेचे विशेषज्ञ उपलब्ध असणे व एकमेकांशी जोडलेल्या शाळा उपलब्ध असणे, ही काळाची गरज आहे.

ऊ. दुय्यम दर्जाच्या, **कार्यरत नसलेल्या** व मोडकळीस आलेल्या शिक्षक शिक्षण संस्था **बंद करण्यात येतील**.

# व्यावसायिक शिक्षण

## १. व्यावसायिक शिक्षणाला उच्च शिक्षणामध्ये पुनःएकीकरण करणे आणि व्यावसायिक शिक्षणाचे पुनरुत्थान करणे

**उद्देश:** सर्वोच्च दर्जाच्या व्यावसायिक क्षमता निर्माण करतानाच विस्तृत स्वरूपाच्या योग्यता व २१व्या शतकातील कौशल्ये, सामाजिक-मानवी आशयाची जाण आणि प्रबळ नैतिक विचारसरणी अस्तित्वात आणण्याच्या उद्देशाने व्यावसायिकांच्या तयारीसाठी सर्वांगीण दृष्टीकोनाची मुहूर्तमेढ रोवणे

व्यावसायिकांच्या पूर्वतयारीमध्ये नैतिकता व सार्वजनिक क्षेत्राचे महत्व यांचे शिक्षण, अभ्यासाच्या विषयाचे व संबंधित शाखेचे शिक्षण, आणि प्रक्रिया पद्धतींच्या सरावाचे शिक्षण अंतर्भूत असणे आवश्यक आहे – हे घडण्यासाठी व्यावसायिक शिक्षण केवळ ठराविक बाबतीत आत्मसात केलेल्या विशेष ज्ञानापुरते घडून उपयोगी नाही.

अ. व्यावसायिक शिक्षण **एकंदर उच्च शिक्षण प्रणालीचा अविभाज्य भाग** असेल. येथून पुढे स्वतंत्र/एकएकटी तांत्रिक विद्यापीठे, आरोग्यशास्त्र/वैद्यकीय विद्यापीठे, विधी व कृषी विद्यापीठे, किंवा या आणि अशा इतर क्षेत्रातील संस्थांची उभारणी बंद करण्यात येईल. या धोरणानुसार व्यावसायिक किंवा सामान्य शिक्षण प्रदान करणाऱ्या सर्व संस्था सन २०३० पर्यंत दोन्ही प्रकारचे शिक्षण सहजगत्या प्रदान करण्याइतपत प्रगत व प्रगल्भ होणे आवश्यक आहे.

आ. **कृषी शिक्षणाचे** त्याच्या संलग्न शाखांसोबत पुनरुज्जीवन करण्यात येईल. जरी देशातील एकूण विद्यापीठांपैकी अंदाजे ९% विद्यापीठे ही कृषी विद्यापीठे असली तरी उच्च शिक्षणाचा विचार करता कृषी व संलग्न शास्त्रांमध्ये १% हून कमी प्रवेश घेतले जातात. अधिक कुशल पदवीधर व तंत्रज्ञ, नाविन्यपूर्ण संशोधन आणि तंत्रज्ञान व चांगल्या पद्धती यांच्याशी जोडलेला बाजारपेठ आधारित विस्तार या सर्व घटकांच्या आधारे कृषी उत्पादन वाढविण्याकरिता कृषी व संलग्न शाखांची क्षमता व दर्जा सुधारणे अत्यावश्यक आहे. सामान्य शिक्षणाशी एकत्रित केलेल्या कार्यक्रमांच्या माध्यमातून कृषी व पशुवैद्यकशास्त्र या क्षेत्रांमध्ये व्यावसायिक निर्मितीची **क्षमता** वाढविण्याची गती लक्षणीयदृष्ट्या वाढविण्यात येईल. स्थानिक ज्ञान, पारंपरिक ज्ञान व उदयोन्मुख तंत्रज्ञान यांचे आकलन करून त्यांचा यथोचित वापर करू शकणारे आणि त्याचसोबत जमिनीचे घटते उत्पादन, वातावरणातील बदल, आपल्या वाढत्या लोकसंख्येला पर्याप्त अन्नसाठा, इत्यादी गंभीर समस्यांची सखोल जाण असणारे व्यावसायिक विकसित करण्यासाठी कृषी शिक्षणाची रचना बदलण्यात येईल. कृषी शिक्षण प्रदान करणाऱ्या संस्थांचा तेथील **स्थानिक समुदायांना थेट लाभ** झाला पाहिजे. तंत्रज्ञानाची मुहूर्तमेढ रोवणे व त्याचा प्रसार करणे या आवश्यक बाबींना चालना देण्यासाठी कृषी तंत्रज्ञान पार्क्सची उभारणी करणे, हा एक दृष्टिकोन असू शकतो.

इ. **विधी शिक्षणाच्या** कार्यक्रमाची पुनर्रचना करण्यात येईल. न्यायाची कवाडे सर्वसामान्यांना सहजगत्या उघडी असावीत व न्यायनिवाडा दीर्घकाळ रखडत न राहता वेळेवर न्याय मिळावा याकरिता विधीक्षेत्रातील

व्यावसायिक शिक्षण जागतिक स्तरावर स्पर्धात्मक, आणि सर्वोत्तम कार्यपद्धती व नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारणारे असले पाहिजे. त्यासोबतच सदरचे विधी शिक्षण न्यायाच्या संवैधानिक मूल्यांना – सामाजिक, आर्थिक व राजकीय मूल्यांना – जाणणारे व त्यातून उजळून निघालेले असले पाहिजे. तसेच लोकशाही, न्यायविषयक कायदे व मानवी हक्क यांच्या उपयुक्ततेतून व अंमलबजावणीतून राष्ट्रीय पुनर्रचना करण्याच्या दृष्टीने संयुक्तिक असले पाहिजे. **विधिशास्त्राच्या अभ्यासक्रमामध्ये** कायदेशीर विचारसरणी, न्याय तत्त्वे, न्यायशास्त्राचे अनुसरण व इतर संबंधित साहित्यसामग्री पुराव्यानुसार मांडताना तत्कालीन सामाजिक – सांस्कृतिक आशयदेखील योग्यपणे व पुरेशा प्रमाणात प्रतीत झाला पाहिजे.

राज्यात विधी शिक्षण प्रदान करणाऱ्या राज्यातील सर्व संस्थांनी भविष्यातील वकिलांना व न्यायाधीशांना विधी शिक्षण **द्विभाषीय शिक्षणपद्धतीनुसार** प्रदान करण्याचा गांभीर्याने विचार करावा. या दोन भाषांमध्ये इंग्रजीसोबत तो अभ्यासक्रम ज्या राज्यात स्थित असेल तेथील राज्यभाषेचा समावेश व्हावा. यामुळे भाषांतराच्या गरजेपोटी न्यायदानामध्ये होणारा विलंब कमी करता येऊ शकतो.

ई. **आरोग्य सेवा शिक्षणा**मध्ये महत्वपूर्ण बदल करण्यात येतील. या क्षेत्राशी निगडित व्यक्ती जी भूमिका पार पाडतात त्यानुसार आरोग्य सेवा अभ्यासक्रमाचा कालावधी, रचना व आखणी करण्यात येईल. उदाहरणार्थ, प्रत्येक आरोग्य सेवा प्रक्रियांमध्ये/कार्यामध्ये (उदा. ईसीजी काढणे किंवा वाचणे) पात्रता पूर्ण केलेला डॉक्टर गरजेचा नसतो. सर्व **एमबीबीएस पदवीधरांकडे** पुढील बाबी असल्याच पाहिजेत: १) वैद्यकीय कौशल्ये २) रोगाचे निदान करण्याची कौशल्ये ३) शल्यचिकित्साविषयक कौशल्ये व ४) आपत्कालीन कौशल्ये. प्रामुख्याने प्राथमिक निगा देणे व दुय्यम इस्पितळांमध्ये कार्यरत राहण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांसाठी ठराविक अंतराने काळजीपूर्वक ठरविलेल्या निकषांच्या आधारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले जाईल. **एमबीबीएसचे पहिले व दुसरे वर्ष विज्ञान शाखेच्या सर्व पदवीधरांसाठी सामायिक कालावधी** असेल. त्यानंतर विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार एमबीबीएस, बीडीएस, नर्सिंग किंवा इतर कोणताही विशेष विषय निवडू शकतात. इतर वैद्यकीय शाखेच्या, उदा. नर्सिंग, बीडीएस, इ. पदवीधरांनाही एमबीबीएस अभ्यासक्रमाला समांतर प्रवेश (लॅटरल एंट्री) घेण्यास परवानगी असेल. वैद्यकीय शिक्षण पात्रता आराखडा (मेडिकल एज्युकेशन क्वॉलिफिकेशन फ्रेमवर्क) याबाबत आवश्यक कार्यवाही करेल. **नर्सिंग शिक्षणाचा दर्जा** उंचावण्यात येईल, नर्सिंग व इतर उपशाखांसाठी एक राष्ट्रीय मान्यता समितीची (नॅशनल ऍक्रेडीटेशन बॉडी) स्थापण्यात येईल. आपल्या देशातील लोक आजारपणात साधारणतः **विविध प्रकारच्या वैद्यकीय उपचारपद्धतींचा आधार** घेतात. त्यामुळे आपली वैद्यकीय शैक्षणिक पद्धती अशा विविध शाखांचे एकीकरण करणारी असावयास हवी. म्हणजेच ऍलोपथी वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना आयुर्वेद, योग, निसर्गोपचार, युनानी, सिद्ध व होमिओपॅथी (आयुष) अशा इतर वैद्यकीय शाखांचे मूलभूत ज्ञान आत्मसात असले पाहिजे. हीच बाब वर नमूद केलेल्या इतर वैद्यकीय शाखांच्या विद्यार्थ्यांनाही लागू असेल. तसेच सर्व प्रकारच्या आरोग्य सेवा शिक्षणामध्ये **प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा व सामुदायिक औषधे** यांच्यावरही खास भर दिला पाहिजे.

उ. **तांत्रिक शिक्षणापुढे** विशिष्ट आव्हाने आहेत कारण या शाखा पूर्णतः ज्ञानाधिष्ठित नाहीत आणि संपूर्णपणे कौशल्याधिष्ठितही नाहीत. तसेच जसजसा तंत्रज्ञानाचा मानवजातीवरील प्रभाव वाढत जाईल तसतसा तांत्रिक शिक्षण व इतर शाखा यांच्यातील एकएकटे काम करण्याची शैलीही लोप पावत जाईल. भविष्यात कैक दशकांसाठी सर्व क्षेत्रांमध्ये उच्चविभुषित लोकांची प्रचंड मागणी राहीलच. पण त्याचसोबत नवकल्पना व संशोधन यांच्या चालना मिळण्यासाठी उद्योगजगत व शैक्षणिक संस्था यांच्यामध्ये अधिक दृढ परस्परसहकार्य असण्याची गरज भासेल. सध्याच्या व भविष्यात उपयुक्त ठरतील अशा दोन्ही पद्धतींसाठी सुसज्ज असलेले आणि उदयोन्मुख विज्ञान व तंत्रज्ञान यांचा पुरेपूर विनियोग करणारे व त्याचसोबत बदलत्या सामाजिक - आर्थिक व पर्यावरणीय आशयानुसार आपल्या कृतीतून प्रतिसाद देऊ शकणारे व्यावसायिक तयार करण्यासाठी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या **कार्यक्रमांमध्ये सुधारणा** करण्यात येतील. विविध, बहुतांश वेळा अनोळखी बाबतीत आपले ज्ञान व कौशल्ये वापरण्याची आणि व्यावसायिक विचारसरणी व नीतीतत्त्वे आत्मसात करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावी याकरिता **अभ्यासक्रमाचे पुनरुज्जीवन** करण्यात येईल. **नवीन व उदयोन्मुख अभ्यासशाखांच्या**, उदा. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, बिग डेटा ऍनॅलिसिस, इत्यादींच्या समावेशाबद्दल **व्यूहरचनात्मक भर** देण्यात येईल.

संस्थांना प्रदान करण्यात येणारी मान्यता व मानांकन यांमुळे उद्योगजगत व अध्यापकवर्ग यांच्यातील परस्परसहकार्य वाढण्यास **प्रोत्साहन** मिळेल आणि विद्यार्थ्यांच्या औद्योगिक अनुभवात भर पडून नवनवीन इंटर्नशिप संधी निर्माण होण्याचे प्रमाण वाढेल.

# राष्ट्रीय संशोधन फाऊंडेशन

## १. दर्जेदार शैक्षणिक संशोधनाचा यथार्थ विनियोग करणे

**उद्देश:** विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये संशोधनाचे बीजारोपण होऊन त्याची वृद्धी व्हावी या हेतूने देशभरातील सर्व शैक्षणिक शाखांमध्ये संशोधन व नवकल्पना याबाबत चालना देणे – स्पर्धात्मक सहयोग-पुनर्विलोकनाद्वारे (पियर रिव्ह्यू) करण्यात येणारा अर्थपुरवठा, मार्गदर्शन (मेंटॉरिंग) व सुलभीकरण यांमधून संशोधनासाठी पोषक वातावरण निर्माण करणे.

विशाल व चैतन्यमय अर्थव्यवस्थेच्या वाढीमध्ये व ती टिकविण्यामध्ये, समाजाचा दर्जा उंचाविण्यामध्ये आणि राष्ट्राला अत्युच्च कामगिरी करण्यास प्रेरित करण्यामध्ये संशोधन व नवकल्पना अतिशय मध्यवर्ती भूमिका बजावतात. वातावरण, तंत्रज्ञान, लोकसंख्येचे चलन (पॉप्युलेशन डायनॅमिक्स) आणि अशा गोष्टींमध्ये जगभर झपाट्याने होत असलेल्या बदलांमुळे कणखर व सशक्त संशोधन प्रणाली अस्तित्वात असणे अतिशय महत्वाचे झाले आहे.

अ. संसदेमध्ये कायदा संमत करून भारत सरकारची एक स्वायत्त संस्था या अर्थी नॅशनल रिसर्च फाऊंडेशनची स्थापना करण्यात येईल. त्यास रु. २०,००० कोटी (~ जीडीपीच्या ०.१%) इतके वार्षिक अनुदान देण्यात येईल. पुढील दशकामध्ये दर्जेदार संशोधनासाठी असलेली देशाची क्षमता जसजशी विकसित होत जाईल, तसतसे हे अनुदानही टप्प्याटप्प्याने वाढविण्यात येईल.

आ. या फाऊंडेशनच्या प्राथमिक आवाक्यामध्ये खालील बाबींचा समावेश असेल:

- शैक्षणिक क्षेत्रामध्ये सर्व शाखांमध्ये होत असलेल्या संशोधनास स्पर्धात्मक, सहयोग-पुनर्विलोकन (पियर रिव्ह्यू) पद्धतीद्वारे अर्थपुरवठा करणे
- देशभर शैक्षणिक संस्थांमध्ये संशोधन क्षमतेची बांधणी करणे
- संशोधक, शासन व उद्योगजगत यांदरम्यान लाभदायी नातेसंबंध निर्माण करणे की जेणेकरून निकडीच्या राष्ट्रीय समस्यांबाबत प्राधान्याने संशोधन होईल आणि संशोधनातून निष्पन्न झालेल्या अभिनव उपाययोजना सर्वसामान्य जनतेच्या लाभार्थ राबवून त्यांच्या समस्यांचे निवारण करणे
- विशेष पुरस्कार व परिसंवाद (सेमिनार्स) यांच्याद्वारे उत्कृष्ट संशोधनाचा सन्मान करणे

इ. या फाऊंडेशनमध्ये प्रारंभी चार प्रमुख विभाग असतील – विज्ञान, तंत्रज्ञान, समाजशास्त्रे आणि कला व मानव विज्ञान.

# लक्ष केंद्रित करावयाच्या अतिरिक्त महत्वाच्या बाबी

## १. शैक्षणिक तंत्रज्ञान

**उद्देश:** शिक्षकांची अध्यापनाबाबतची पूर्वतयारी व विकास यांच्या साहाय्यार्थ; अध्यापन, अध्ययन व मूल्यमापन पद्धती सुधारणे; वंचित गटांना मिळणारी शिक्षणाची सुविधा वृद्धिंगत करणे; आणि शैक्षणिक नियोजन, प्रशासन व व्यवस्थापन यांच्यात सुसूत्रता आणणे अशा बाबींकरिता शिक्षणाच्या सर्व स्तरांमध्ये तंत्रज्ञानाचा समावेश करणे

१) अध्यापन, अध्ययन व मूल्यमापन पद्धती सुधारणे; २) शिक्षकांची अध्यापनाबाबतच्या पूर्वतयारीस व त्यांच्या निरंतर व्यावसायिक विकासास साहाय्य करणे; ३) वंचित गटांना मिळणारी शिक्षणाची सुविधा वृद्धिंगत करणे; आणि शैक्षणिक नियोजन, प्रशासन व व्यवस्थापन यांच्यामध्ये सुसूत्रता आणणे अशा बाबींकरिता शिक्षणाच्या सर्व स्तरांमध्ये तंत्रज्ञानाचा समावेश करण्यात येत असल्याबाबतची दक्षता घेणे, हे सदर धोरणाचे उद्दिष्ट राहील.

अ. तंत्रज्ञानाचे प्रेरण (इंडक्शन) म्हणजेच (प्रथमतः उपयोगात आणणे), उपयोजन (डिप्लॉयमेंट) व वापर करण्याबाबत निर्णयप्रक्रियेत सुलभता यावी, या उद्देशाने **राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच (नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम)** नावाच्या स्वायत्त संस्थेची स्थापना करण्यात येईल. यासाठी शैक्षणिक संस्था, राज्य शासन व केंद्र शासन यांचे नेतृत्व आणि इतर भागधारक (स्टेकहोल्डर्स) यांना अद्ययावत ज्ञान व संशोधन पुरवून त्यासोबत एकमेकांकडे असलेल्या सर्वोत्तम कार्यपद्धतींविषयी एकमेकांशी सल्लामसलत व देवाणघेवाण करण्याची संधी देण्यात येईल.

आ. अंकीय संग्रह (डिजिटल रिपॉझिटरी), तंत्रज्ञानाच्या विनियोगाबाबत शिक्षकांची तयारी, योग्यताप्राप्त साहाय्य व संशोधन यांच्याद्वारे तंत्रज्ञानाचा शैक्षणिक प्रक्रियांमध्ये (उदा. अध्यापनशास्त्रामध्ये साधन या अर्थी भाषांतराचे साहाय्य, निरंतर व्यावसायिक विकास घडविणे व ऑनलाईन कोर्सेस, इत्यादी पुरविणे) समावेश करण्यात येईल. संशोधनकार्यासाठी व तंत्रज्ञानाच्या विनियोगास समुचित साहाय्य व्हावे याकरिता शैक्षणिक तंत्रज्ञानामध्ये उत्कृष्टता केंद्रांची (सेंटर्स ऑफ एक्सलन्स) स्थापना करण्यात येईल.

इ. शैक्षणिक माहितीच्या राष्ट्रीय संग्रहामध्ये (नॅशनल रिपॉझिटरी ऑफ एज्युकेशनल डेटा) अंकीय स्वरूपात संस्था, शिक्षक व विद्यार्थ्यांची सर्व इत्यंभूत माहिती जतन करण्यात येईल.

## २. व्यावसायिक शिक्षण

**उद्देश:** शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे अशा सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्थांमध्ये व्यावसायिक शिक्षणाचा समावेश करणे. सन २०२५ पर्यंत सर्व शिकाऊ विद्यार्थ्यांपैकी किमान ५०% विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचा लाभ देणे.

सदरचे धोरण भारतातील वैविध्यपूर्ण कुशल लोकसंख्येच्या पूर्ण क्षमतेनुसार त्यांची प्रगती करण्याहेतू सन २०२५ पर्यंत शालेय व उच्च शिक्षण प्रणालीमधून किमान ५०% विद्यार्थ्यांचा कौशल्यविकास करण्याचे ध्येय प्रतीत करते.

अ. पुढील दशकभरात व्यावसायिक शिक्षण **सर्व शिक्षण संस्थांमध्ये टप्प्याटप्प्याने समाविष्ट** करण्यात येईल. कौशल्य त्रुटी विश्लेषण (स्किल गॅप ऍनॅलिसिस) व स्थानिक संधींचे मॅपिंग यांनुसार कार्यक्षेत्रांना प्राधान्य देण्यात येईल. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण उदारमतवादी शिक्षणाच्या व्यापक दृष्टिकोनाचा भाग असेल. व्यावसायिक शिक्षणाच्या एकीकरणासाठी असलेली राष्ट्रीय समिती या प्रयत्नावर देखरेख ठेवेल.

आ. सदर बदल शैक्षणिक संस्था, तांत्रिक संस्था व उद्योगजगत यांच्यातील परस्परसहकार्यातून सुलभरित्या करण्यात येईल. एकीकरणासाठी एका स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात येईल.

इ. प्रत्येक शैक्षणिक शाखा/व्यावसायिक शाखा/पेशाकरिता **'राष्ट्रीय कौशल्ये पात्रता आराखडा' ('नॅशनल स्किल्स क्वॉलिफिकेशन्स फ्रेमवर्क')** अधिक सविस्तरपणे विस्तृत करण्यात येईल. तसेच आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन) अधिपत्याखाली असलेल्या आंतरराष्ट्रीय व्यवसाय वर्गीकरण मानकानुसार भारतीय मानके सुसंगत केली जातील. सदर आराखड्याच्या आधारावर **पूर्वी प्राप्त केलेल्या अध्ययनास अधिकृत मान्यता** देण्यात येईल. याद्वारे औपचारिक शिक्षण प्रणालीतून मध्येच बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रात्यक्षिक अनुभवाच्या आधारे आराखड्याच्या संबंधित स्तरामध्ये पुढील शिक्षणासाठी पुनःप्रवेश देण्यात येईल. सदर आराखड्यामुळे सामान्य शिक्षण व व्यावसायिक शिक्षण यांदरम्यान गतिशीलता आणणे सुलभ होईल.

ई. **सन २०३०-३५ पर्यंत पदवीपूर्व स्तरामधील** व्यावसायिक शिक्षण **एकूण विद्यार्थीप्रवेशाच्या ५०% पर्यंत** वाढविण्यात येईल. उच्च शिक्षण संस्था स्वतंत्रपणे किंवा उद्योगजगताच्या सहयोगाने विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण प्रदान करू शकतात.

उ. उच्च शिक्षण संस्था व्यावसायिक शिक्षणाच्या **मॉडेल्स**मध्ये आणि ऍप्रेंटिसशिपच्या रचनेमध्ये गरजेनुसार प्रयोग करू शकतात. उच्च शिक्षण संस्थांमध्ये उद्योगजगताच्या सहयोगाने विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण केंद्रे (इन्क्युबेशन सेंटर्स) उभारण्यात येतील.

**१. 'लोक विद्या'**, म्हणजेच भारतामध्ये विकसित करण्यात आलेले ज्ञान, विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रमामध्ये एकीकरण करून प्रदान करण्यात येईल.

## ३. प्रौढ शिक्षण

**उद्देश:** सन २०३० पर्यंत युवा व प्रौढ साक्षरता दर १००% पर्यंत आत्मसात करणे आणि प्रौढ शिक्षण व इतर शैक्षणिक उपक्रम/कार्यक्रम यांचा लक्षणीयदृष्ट्या विस्तार करणे

साक्षरता व मूलभूत शिक्षण व्यक्तिगत, नागरी, आर्थिक व आजीवन अध्ययन संधींमधील व्यक्तीचा सहभाग सक्षम करते – हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. तथापि, आपल्या युवा व प्रौढ लोकसंख्येचा अविश्वसनीय वाटेल इतका मोठा हिस्सा अद्याप निरक्षर आहे.

अ. पुढील पाच व्यापक कार्यक्षेत्रांच्या दृष्टीने प्रौढ शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (नॅशनल क्युरिकलम फ्रेमवर्क) विकसित करण्यात येईल – मूलभूत साक्षरता व अंकज्ञान, अत्यावश्यक जीवन कौशल्ये, व्यावसायिक कौशल्ये, मूलभूत शिक्षण व निरंतन शिक्षण. सदर आराखड्याशी सुसंगत असेल अशा प्रकारे मूल्यमापनाच्या व प्रमाणनाच्या निकषांसह पाठ्यपुस्तके व अध्ययन साहित्यसामग्री विकसित करण्यात येईल.

आ. प्रौढ शिक्षण केंद्रातील व्यवस्थापक व निर्देशक यांचा **संवर्गाला** आणि त्यांच्यासोबत राष्ट्रीय प्रौढ शिक्षण अध्यापक कार्यक्रमाच्या (नॅशनल ॲडल्ट एज्युकेशन ट्युटर्स प्रोग्रॅम) माध्यमातून तयार केलेल्या व्यक्तिगत अध्यापकांच्या मोठ्या संघाला प्रौढ शिक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी कार्यान्वित करण्यात येईल.

इ. सहभागी उमेदवारांच्या शोधनासाठी **विद्यमान दृष्टिकोन व कार्यक्रम** वापरण्यात येतील. समुदायातील स्वयंसेवकांना याकरिता प्रोत्साहित केले जाईल. समुदायातील प्रत्येक साक्षर सदस्याला किमान एका निरक्षर व्यक्तीला वाचायला शिकविण्यास प्रवृत्त करणे, ही महत्वाची व्यूहरचना ठरू शकते. याविषयी **व्यापक स्वरूपात जनजागृती** करण्यात येईल. **स्त्री साक्षरतेवर** विशेष भर देण्यात येईल.

## ४. भारतीय भाषांना चालना

**उद्देश:** सर्व भारतीय भाषांचे संवर्धन, वृद्धी व चैतन्य अबाधित राखले जाईल याची दक्षता घेणे

आदिवासी भाषांसह सर्व भारतीय भाषांना जेव्हा योग्य सन्मान दिला जाईल तेव्हाच देशातील प्रत्येक प्रदेशाच्या संस्कृतीचे व परंपरांचे खऱ्या अर्थी अंतर्भावाची व संवर्धनाची पूर्तता होईल आणि शाळेमध्ये सर्व विद्यार्थ्यांकडून त्यांचे आकलन सर्वार्थाने साध्य होईल. अशा प्रकारे मूलतःच समृद्ध असलेल्या भारतीय भाषांचे व साहित्यांचे संवर्धन करणे अत्यावश्यक आहे.

अ. देशभरातून भारतीय भाषा व साहित्य यांचे सक्षम कार्यक्रम राबविणे, भाषा शिक्षकांची व अध्यापकांची भरती, एकाग्रतेने केलेले संशोधन आणि शास्त्रीय भाषांना चालना या उपक्रमांद्वारे भारतीय भाषा, साहित्य व शास्त्रीय शब्दकोष यांच्यावर लक्ष केंद्रित करण्यात येईल.

आ. शास्त्रीय भाषा व साहित्य यांना चालना देण्याकरिता अस्तित्वात असलेल्या विद्यमान राष्ट्रीय संस्थांचे सबलीकरण करण्यात येईल. पाली, फारसी व प्राकृत भाषांसाठी राष्ट्रीय संस्थेची स्थापना करण्यात येईल.

इ. देशभरातून एकसमान विनियोगासाठी उपयुक्त ठरावी या हेतूने एक शब्दकोष विकसित करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा आयोगाच्या उपक्रमाचे नूतनीकरण करण्यात येईल आणि त्यामध्ये केवळ भौतिक शास्त्रांचाच नव्हे तर सर्व शैक्षणिक विषयांचा, शाखांचा व क्षेत्रांचा समावेश करण्यास्तव त्याचा व्यापक स्वरूपात विस्तार करण्यात येईल.

# राष्ट्रीय शिक्षण आयोग

## १. शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल: राष्ट्रीय शिक्षण आयोग

**उद्देश:** एका नव्या राष्ट्रीय शिक्षण आयोगाच्या अधिपत्याखाली दूरदृष्टीपासून अंमलबजावणीपर्यंत प्रत्येक बाबतीत सर्व स्तरांवर न्याय्यता व सर्वोत्तमता देण्यासाठी भारतीय शिक्षण प्रणाली परस्परसहयोगाने कार्यान्वित करणे

भारतीय शिक्षण प्रणालीला असे प्रेरणादायी नेतृत्व हवे आहे जे हाती घेतलेल्या विधायक कार्याची सर्वोत्तम अंमलबजावणीसुद्धा करेल.

अ. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली सर्वोच्च समिती या नाते 'राष्ट्रीय शिक्षण आयोग' किंवा 'दि नॅशनल एज्युकेशन कमिशन'ची स्थापना करण्यात येईल.

आ. केंद्रीय शिक्षणमंत्री या आयोगाचे उपाध्यक्ष राहतील आणि आयोगाच्या दैनंदिन कामकाजासाठी थेट जबाबदार राहतील.

इ. या **आयोगामध्ये** ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ, संशोधक, केंद्रीय मंत्री, राज्यांचे मुख्यमंत्री व विविध क्षेत्रातील ख्यातनाम व्यावसायिक यांचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल. या आयोगातील सर्व सदस्य अतिशय निष्णात आणि संबंधित क्षेत्रामध्ये सार्वजनिकरित्या बहुमूल्य योगदान दिलेले असतील आणि सदर व्यक्ती निर्विवाद सचोटीच्या व स्वतंत्र विचारसरणीच्या असतील.

ई. हा आयोग **भारतातील शिक्षणाचा परिरक्षक (कस्टोडियन)** असेल. हा आयोग आपल्या समाजातील वैविध्याचे जतन करताना शिक्षणाबाबत एकीकृत राष्ट्रीय दूरदृष्टी निर्माण करेल. सदर आयोग सर्व संबंधित कृतीकारक घटक आणि राष्ट्रीय, राज्य व संस्था स्तरावरील नेते यांच्याकडून प्रभावी व समक्रमित (म्हणजे परस्परांमध्ये समन्वय असलेला) दृष्टिकोन आणि कृती घडवून आणेल.

उ. कामकाजातील समन्वय व सुसूत्रता अबाधित राखण्यासाठी **सदर आयोग सर्व राज्यांसोबत बारकाईने व दक्षतेने कार्यरत** राहील. राज्य शासने आवश्यकतेनुसार राज्य स्तरीय उच्च समिती नेमू शकतील. अशा समितीचे नाव 'राज्य शिक्षण आयोग' किंवा 'दि स्टेट एज्युकेशन कमिशन' असे असेल.

# शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य

## १. शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य

अ. सदर धोरण शैक्षणिक गुंतवणूक वाढविण्यासाठी वचनबद्ध आहे कारण त्यास विश्वास वाटतो की, समाजाच्या भविष्याचा एकत्रितरित्या विचार करता समाजाच्या सर्वांगीण लाभासाठी शिक्षणापेक्षा अधिक उपयुक्त व सुयोग्य अशी दुसरी कोणतीही गुंतवणूक अस्तित्वात नाही.

आ. त्यामुळे **येत्या १० वर्षांच्या कालावधीत केंद्र शासन व सर्व राज्य शासने या दोघांकडून शिक्षणक्षेत्रामध्ये होणारी शासकीय गुंतवणूक २०% पर्यंत वाढविण्याची परिकल्पना** सदर धोरणामध्ये मांडण्यात येते.

इ. अध्ययन साधनसामग्री, विद्यार्थ्यांची सुरक्षा व निकोप विकासासाठीच्या आवश्यक बाबी, पोषणविषयक साहाय्य, पुरेसा अध्यापकवर्ग, शिक्षक विकास आणि वंचित गटांसाठी व कमी प्रतिनिधित्व असलेल्या गटांसाठी न्याय्य व उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देणाऱ्या सर्व उपक्रमांना साहाय्य अशा महत्वपूर्ण घटकांसाठी आवश्यक असलेल्या अर्थसाहाय्याबाबत कोणतीही तडजोड करण्यात येणार नाही.

ई. सदर धोरण शिक्षणक्षेत्रामध्ये खाजगी स्वरूपात परोपकारी उपक्रमांचे पुनरुज्जीवन, सक्रिय प्रचार आणि साहाय्य करण्यासाठी सर्वांना आवाहन करते. कोणत्याही शैक्षणिक सत्कार्यासाठी नफाविरहित तत्त्वावरील संपूर्ण जनहितार्थ निधीचा विनियोग विद्यमान संस्थांच्या महत्वपूर्ण गरजा भागविण्यासाठी करण्यात येईल.

उ. प्रारंभी एकदाच, मुख्यतः पायाभूत सुविधेसाठी (इन्फ्रास्ट्रक्चर) व साधनसामग्रीसाठी, करावयास लागणाऱ्या खर्चाव्यतिरिक्त **पुढील महत्वाच्या बाबतीत अर्थसाहाय्य** लागणार असल्याचे सदर धोरणात प्रतीत होते: १) प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणाचा विस्तार व सुधारणा, २) पायाभूत साक्षरता व अंकज्ञान साध्य होत असल्याची खात्री, ३) शालेय संकुलांना पुरेशा व योग्य साधनसामग्रीचा पुरवठा, ४) अन्न व पोषण (नाश्ता व माध्यान्ह भोजन), ५) शिक्षक शिक्षण व शिक्षकांचा निरंतर व्यावसायिक विकास, ६) महाविद्यालये व विद्यापीठे यांच्यात लक्षणीय सुधारणा, आणि ७) संशोधन.

ऊ. निधींचा तरल, वेळेनुसार व योग्य पुरवठा होईल आणि त्यांचा विनियोग सचोटीने होईल यावर शासन व व्यवस्थापन विशेष भर देईल. सदर बाब भूमिकांचे सुस्पष्ट विलगीकरण, संस्थांचे सबलीकरण व त्यांना देण्यात येणारी स्वायत्तता, नेतृत्वयोग्य भूमिका आणि सुज्ञ पर्यवेक्षण यांकरिता प्रभावी लोकांची नियुक्ती अशा उपाययोजनांद्वारे साध्य करण्यात येईल.

ऋ. 'सुटसुटीत पण कडक' विनियमन दृष्टिकोन, शासकीय शिक्षणामध्ये मुबलक गुंतवणूक, आणि पारदर्शक सार्वजनिक माहिती प्रकटनासह उत्तम अनुशासनासाठी उपयुक्त यंत्रणा यांच्यासह बहुविध संबंधित आघाड्यांद्वारे **शिक्षणाच्या व्यापारीकरणाची** बाब सदर धोरणामध्ये हाताळण्यात आली आहे.

## २. भविष्यातील वाटचाल

शिक्षणाशी संबंधित सर्व घटकांमध्ये व समित्यांमध्ये नियोजन व सूत्रबद्धता याबाबत सुसंगती अबाधित राहून सदर धोरणाची अंमलबजावणी त्यामध्ये अभिप्रेत असलेल्या आत्मीयतेने व उद्देशाने होत असल्याची खात्री व्हावी म्हणून सदर धोरणामध्ये विविध समित्यांकरवी करण्यात येणाऱ्या महत्वपूर्ण कृती, त्यासाठी अपेक्षित असलेला कालावधी व पुनर्विलोकनाचा आराखडा मांडण्यात आला आहे.

मानवजातीच्या प्रत्येक युगामध्ये मनुष्याच्या सर्व पूर्वपिढ्यांनी जे काही निर्मिलेले आहे ते ज्ञानातून मांडलेले आहे. त्यामध्ये येणारी नवी पिढी स्वतःच्या योगदानाची भर घालते.

मोबिअसच्या पट्टीचे तत्त्व ज्ञानाच्या शाश्वत, विकसनशील व जिवंत स्वरूपाचे प्रतीक आहे
- ज्याला ना आरंभ आहे, ना शेवट आहे.

या सातत्यपूर्ण प्रयत्नाद्वारे ज्ञानाची निर्मिती, संक्रमण, विनियोग व प्रसारण करणे, ही या धोरणांची परिकल्पना आहे.